www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

दैं.युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापूर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक – सौ भारती संतोष आमले उपसंपादक – श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक – श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक – श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 219 वा गुरुवार दि. २४ एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

# पनवेल मध्ये केला मुस्लिम बांधवानी पाकिस्तानसह आतंकवाद्यांचा निषेध







**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**
काश्मीर मधील पहलगाम येथे झालेल्या हल्ल्यात अनेक निष्पाप जीवांना आपले प्राण गमवावे लागले. नाव आणि धर्म विचारून दहशतवाद्यांनी निष्पाप पर्यटकांना लक्ष केले. या हल्ल्याचा आम्ही निषेध करत आहोत. देशातील शांतता अबाधित ठेवण्यासाठी आणि शांतता कायम राखण्यासाठी सकल मुस्लिम समाज पनवेलतर्फे शहरातून निषेध मोर्चा काढण्यात आला. यावेळी पाकिस्तान मुर्दाबाद आतंकवाद मुर्दाबाद अशी निषेधात्मक घोषणा देऊन निषेध व्यक्त केला. पनवेल शहरातील मुस्लिम नाका येथील सुविधा मेडिकल जवळ सायंकाळी पाच वाजता मोर्चाला सुरुवात झाली. काळे झेंडे दाखवत,पाकिस्तान मुर्दाबाद अशा घोषणा देत मुस्लिम बांधव या मोर्चात सहभागी झाले होते. दहशतवाद्यांनी मुसलमानांचे नाव घेऊन जो हल्ला केला त्यामुळे भारतात मुस्लिम समाज बदनाम झाला आहे. मुसलमानांच्या नावाने उद्या कोणीही काहीही करू शकतो. परंतु भारतीय मुस्लिम नेहमीच देश हितासाठीच जगणार आहे अशी प्रतिक्रिया मोर्चात सहभागी झालेल्या नागरिकांनी दिली. छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ मोर्चाचा समारोप करण्यात आला. मोर्चादरम्यान काही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक बजरंग राजपूत परिस्थितीवर लक्ष ठेवून होते. पूर्ण पोलीस बंदोबस्तात हा मोर्चा काढण्यात आला. विशेष म्हणजे या मोर्चात मुस्लिम महिला देखील सहभागी होऊन निषेध नोंदवत होत्या. यामध्ये प्रामुख्याने इकबाल काझी, मा.नगरसेवक मुकीत काझी, जैनाब शेख, संतोष पवार, सोफिया मुकादम, सलमान मुकादम, पंचशील शिरसाट, जमीर पठाण, सुश्मिता मोहिते, रेहाना हुसेन, नावेद पटेल, नवाद पटेल, अदनान अन्सारी, बिस्मिल्ला करंबेळकर, सना शेख, सलमा कच्ची रजिया कच्ची, कैकशा शेख, मॅरियम करंबेलकर यांच्यासह मुस्लिम समाजाला या मोर्च्यात पाठिंबा देण्यसाठी विविध समाज बांधव सहभागी झाले होते.

## काश्मीर दहशतवादी हल्ल्याचा राष्ट्रवादीतर्फे उद्या निषेध

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण वार्ताहर**
काल काश्मीरमधील पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर झालेला भ्याड दहशतवादी हल्ला हा मानवतेच्या विरोधातील कृत्य असून, संपूर्ण देशाच्या मर्मावर आघात करणारा आहे. या हल्ल्यात ज्यांनी प्राण गमावले, त्या सर्व भावनांनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करतो. देशातील शांतता, एकोपा आणि सौहार्द धुळीस मिळवण्यासाठी हे दहशतवादी कट रचले जात आहेत, पण आपल्या एकतेपुढे हे सर्व प्रयत्न नेहमीच निष्फळ ठरतील. याच पार्श्वभूमीवर उद्या गुरुवार, दि. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता, चिंचनाका – चिपळूण येथे, सर्व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जागरूक नागरिकांनी एकत्र येऊन या अमानवी कृत्याचा निषेध नोंदवावा यासाठी आपली उपस्थिती ही केवळ निषेध नाही, तर देशाच्या सुरक्षेसाठी, बंधुभावासाठी आणि मानवतेसाठी उभा केलेला एक सशक्त आवाज असेल. तरी आवश्य उपस्थित राहावे असे आवाहन तालुकाध्यक्ष नितिन ठसाले, विधानसभा क्षेत्राध्यक्ष रमेश राणे, शहराध्यक्ष मिलिंद कापडी, महिला तालुकाध्यक्ष जागृती शिंदे, युवक अध्यक्ष निलेश कदम यांनी आवाहन केले आहे.

## अल्पवयीन मुलीच्या नातेवाईकांचा शोध सुरू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, दि.23 (संजय कदम)** : पनवेल रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एक सहा वर्षीय अल्पवयीन मुलगी सापडली असून तिच्या नातेवाईकांचा शोध पनवेल रेल्वे पोलीस करीत आहेत. सदर मुलगी आपले नाव पिंचुक पोपट (पिंकी) एवढेच सांगते. वय 6 वर्षे, ती कुठे राहते तिला माहित नाही. या मुली संदर्भात कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी हरवलेले महिला व बालके विषयी पनवेल रेल्वे पोलिसांनी प्रभावीपणे राबविलेल्या शोध मोहिमेंतर्गत वपोनि संजय चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय यादव, म.पो.हवा.बोराटे मो.नं.9821425404 व पो.शि.आर.एस.मुंडे मो.नं.9075311390 येथे संपर्क साधावा.

## महात्मा फुले महाविद्यालयामध्ये पदवीदान समारंभाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
पनवेल येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये ३० एप्रिल रोजी पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे माजी सचिव डॉ. जे. जी जाधव ही प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थितीत राहणार असून समारंभाचे अध्यक्ष रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर हे आहेत. या पदवीदान समारंभांमध्ये सन २०२३-२४ मध्ये झालेल्या पदवी व पदव्युत्तर परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे अशा सर्व विद्यार्थ्यांना पदवी देवून पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहेत. पदवी स्वीकारण्याचा क्षण प्रत्येक विद्यार्थ्याच्या जीवनातील अविस्मरणीय क्षण असतो तो जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना अनुभवता यावा यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ गणेश ठाकूर, उपप्राचार्य, पदवीदान समारंभाचे चेअरमन उपप्राचार्य डॉ आर.ए.पाटील, डॉ.एन.बी.पवार यांनी गतवर्षीच्या सर्व विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना आमंत्रित केले आहे.




पनवेल महानगरपालिकेच्या माजी नगरसेविका सौ नीता माळी मॅडम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना दैनिक युवक आधारचे संपादक श्री संतोष शिवदास आमले

## पाणी टंचाई व नियोजनसंदर्भात पालकमंत्री अतुल सावे यांची आढावा बैठक

### जलसंधारण व टंचाई निवारण्याच्या कामाला प्राधान्य देण्याचे आदेश



**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**
**नांदेड** : राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास,अपारंपारिक ऊर्जा मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आज आपल्या एक दिवसीय दौऱ्यामध्ये विविध विभागाच्या आढावा बैठकी घेतल्या. जिल्ह्यातील टंचाई परिस्थितीची माहिती घेतली. तसेच जिल्हा नियोजनच्या आराखड्यावरही संबंधित यंत्रणेची चर्चा केली. पालकमंत्री अतुल सावे यांचे शासकीय विश्रामगृह येथे आज सकाळी १० वाजता आगमन झाले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश कुमार, मनपा आयुक्त महेशकुमार डोईफोडे,अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर,निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर यांनी त्यांचे स्वागत केले. विश्रामगृहात त्यांच्या भेटीला यावेळी खासदार डॉ.अजित गोपछेडे,आ.राजेश पवार हे देखील आले होते.याशिवाय विविध पदाधिकाऱ्यांनी देखील त्यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा केली. दुपारी पालकमंत्री अतुल सावे यांच्या उपस्थितीत शासकीय विश्रामगृह नांदेड येथे विविध विभागांच्या बैठकांना सुरुवात झाली. उन्हाळ्याच्या दिवसातील विविध विभागांकडून होणारी टंचाई निवारण व जलसंधारणाच्या कामाला गती देण्याचे निर्देशही त्यांनी आज दिले.तसेच जिल्हा नियोजन समितीचे आराखडे देताना अभ्यासपूर्ण व नाविन्यपूर्ण आराखडे सादर करण्याबाबत तयारीला लागण्याचे निर्देशही त्यांनी दिले. आज सर्वप्रथम पोलीस प्रशासन व महानगरपालिका प्रशासन यांच्या सोबत बैठक घेण्यात आली. जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, तसेच महानगरपालिका आयुक्त डॉ.महेश डोईफोडे यांची यावेळी उपस्थिती होती. शहरातील समस्यांसंदर्भात व विविध प्रलंबित विषयांचा आढावा पालकमंत्र्यांनी घेतला. विशेषतः शहरातील वाहतूक,स्वच्छता,रस्ते ,यासंदर्भात लोकप्रतिनिधींकडून आलेल्या सूचना त्यांनी अधिकाऱ्यांना सांगितल्या. शहरांमधील वाहतूक अधिक चांगली करण्याबाबतचे निर्देश त्यांनी यावेळी दिले. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली, यांच्यासोबत दुसरी बैठक घेण्यात आली. यामध्ये जिल्ह्यातील पाणीपुरवठा, पाणीटंचाई, चारा टंचाई, याबाबतचे आगामी काळातील नियोजनाचा आढावा घेण्यात आला. याशिवाय जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या आरोग्य, शिक्षण, पाणीपुरवठा, आदी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. तसेच जिल्हा नियोजन समितीमधून नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच अन्य बाबींचे काटेकोर नियोजन करण्याची यावेळी पालकमंत्र्यांनी सूचना केली.

## मोरे दाम्पत्यांनी रस्त्यावरील पुस्तक विक्रेत्याचा सत्कार करून साजरा केला जागतिक पुस्तक दिन "




**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
२३ एप्रिल रोजी जगभर जागतिक पुस्तक दिन साजरा केला जातो. या वर्षीची थिम " तुमच्या पद्धतीने वाचा आणि आनंदासाठी वाचता येणे आहे." हा दिवस साधारणतः लोकांमध्ये वाचनाची सवय वाढवणे आणि जगभरातील लेखक आणि पुस्तकांचा सन्मान करणे हे या दिवसाचे मुख्य उद्दिष्टे आहे. स्पेन मध्ये मिगेल डे सर्व्हंटिसच्या व विल्यम शेक्सपियर आणि इंका गार्सिलोसो यांच्यासह जगातील ख्यातनाम व्यक्तिंचा या दिवशी मृत्यू झाला होता. पुस्तकांसाठी घर बांधणारे एकमेव महापुरुष भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सुद्धा आजच्या दिवशी आठवण केली जाते. गुणवंत कामगार पुरस्कृत व विशेष कार्यकारी अधिकारी अरविंद मोरे व त्यांच्या सुविद्य पत्नी प्रो. डॉ. नीलिमा अरविंद मोरे यांनी रस्त्यावरील पुस्तक विक्रेता,.डी.एफ.सी. चौक, नवीन पनवेल (पूर्व) येथील कार्तिक दशरथ शॉ यांचा पुष्पगुच्छ, मिठाई देऊन, स्वयं लिखित पुस्तक भेट देऊन व काही पुस्तके खरीदी करून त्यांचा सत्कार करून त्यांना जागतिक दिनाच्या शुभेच्छा देऊन जागतिक पुस्तक दिन साजरा केला. याप्रसंगी अरविंद मोरे यांनी कार्तिक दशरथ शॉ यांच्याशी हितगुज केले. कार्तिक शॉ यांनी गेल्या ३० वर्षांपासून हे पुण्य कार्य करत असल्याचे सांगितले. ते म्हणाले की शिक्षणापेक्षा दुसरे माणसाच्या जीवनात महत्वाचे काही नाही. ते पुस्तक विकतच नाही तर ते पुस्तके सुद्धा वाचतात असे त्यांनी सांगितले. त्यांनी पुस्तकांची प्रेरणा घेऊन त्यांची दोन्ही मुले आर्किटेक आणि बी.टेक झाली आहेत असे सांगितले. त्यांनी दि मॅजिक थिंकिंग बिग, यु कॅन विन, भागवत गीता, डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे भारताचे संविधान व ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे अग्निपंख वाचल्याचे सांगितले. त्यांनी सांगितले की पुस्तक विकल्यामुळे माझा संबंध अभ्यासू लोकांशी येतो आणि त्यामुळे त्यांचे ज्ञान वाढते असे सांगितले. सत्कार केल्याबद्दल त्यांना खूप आनंद झाला व पहिल्यांदा माझ्या सामाजिक कार्याची नोंद घेतल्या बद्दल बरे वाटले. याप्रसंगी अरविंद मोरे यांनी स्वयं लिखित " कुतूहलाचा करिश्मा " हे पुस्तक भेट सुद्धा दिले. विशेष म्हणजे हा सगळा प्रकार शेजारी कर्तव्य बजावत असलेले ट्राफिक पोलीस बघत होते. त्यांनी सहज विचारले हे काय सुरु होते. त्यांना जागतिक पुस्तक दिना निमित्त सत्कार केल्याचे सांगितले तर त्यांनी लगेच सॅल्यूट ठोकला व खूप चांगले काम केल्याची दाद दिली

## मेंढपाळांची मुले गिरवतात जर्मन भाषेचे धडे

### शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचेकडून शिक्षक सचिन ठाणगे यांचा गौरव

**दैनिक युवक आधार**
आष्टी प्रतिनिधी बाळासाहेब रकटाटे
पारनेर तालुक्यातील धोत्रे खुर्द जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक सचिन ठाणगे यांच्या संकल्पनेतून धोत्रे खुर्द शाळेतील विद्यार्थी जर्मन भाषा शिकून तिचे वाचन आणि लेखन करण्याची आवड जोपासत आहेत. शालेय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना वेगळी वाट शोधता यावी, यासाठी ग्रामीण भागातील मुलांना जर्मन भाषा शिकविण्याच्या संकल्पनेतून भविष्यवेधी बहुभाषीक शिक्षण देण्याचा प्रयत्न या शाळेत होत आहे. राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेले कुशल मनुष्यबळ आणि इतर देशांमधे त्यांची असणारी कमतरता या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने जर्मन देशातील ‘बाडेन बुटेनबर्ग’ या राज्यात कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याबाबत नुकताच सामंजस्य करार केला आहे . जर्मन भाषेच्या माध्यमातून परदेशात नोकरीच्या अनेक संधी उपलब्ध आहेत, परंतु भाषेचे ज्ञान अवगत नसल्यामुळे अनेक भारतीय मुलांना संधी मिळत नाही.



मुले संख्याचे वाचन व लेखन, स्वतःबद्दल माहिती,आपसात संभाषण या क्रिया जर्मन भाषेत करतात. शालेय अभ्यासाबरोबरच मुले जर्मन भाषेचा अभ्यास आवडीने करत आहेत. अतिशय दुर्गम भागातील मेंढपाळांच्या मुलांना तंत्रज्ञानाच्या मदतीने जर्मन भाषेचे ज्ञान दिले . त्याबद्दल शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शिक्षक सचिन ठाणगे यांचे कौतुक केले. मुलांना त्यांच्या आवडीप्रमाणे वेगवेगळ्या भाषा शिकवल्या तर त्यांना अभ्यासाची गोडी निर्माण होते. हा बहुभाषिक प्रकल्प राज्याला दिशादर्शक असल्याचे मत दादा भुसे यांनी व्यक्त केले .

ग्रामीण भागातील तिसरीच्या मुलांनी जर्मन भाषा अवगत करणे ही खूप विशेष बाब आहे , या आगोदरही ठाणगे यांनी मुलांना मोडी लिपीचे ज्ञान दिले आहे, असे उपक्रमशील शिक्षक जिल्हा परिषदेच्या शाळेत आहेत, याचा आम्हाला अभिमान आहे, असे मत जिल्हा परिषदचे मुख्यकार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी व्यक्त केले. या उपक्रमाचे शिक्षणाधिकारी भास्कर पाटील ,गटशिक्षणाधिकारी सिमाताई राणे, लेखाधिकारी रमेश कासार, विस्तार अधिकारी कांतिलाल ढवळे, जयश्री कार्ले, केंद्रप्रमुख उत्तम फंड व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

## शौचालय उभारण्याच्या पाठपुराव्याला अखेर यश : सुरेखा मोहकर

**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ:**
**नवीमुंबई प्रतिनिधी प्रमुख**
पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ च्या माजी नगरसेविका डॉ.सुरेखा वि.मोहोकर यांनी गार्डन हॉटेल जवळ नागरिकांच्या सोयीकरिता शौचालयाची मागणी करून,अविश्रांतपणे पाठपुरावा चालूच ठेवली होता. याकरिता त्यांनी तब्बल १० वेळा स्मरण पत्र दिले व यातून आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला होता. पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनानुसार हा पाठपुरावा अखंडितपणे चालूच होता. यानुसार तत्कालीन माननीय आयुक्त गणेश देशमुख तसेच सध्याचे मा.आयुक्त मंगेश चितळे यांच्याबरोबर डॉ. सुरेखा मोहोकर व डॉ.विलास मोहोकर यांनी वारंवार बैठका घेऊन नागरिकांच्या विशेषतः महिला व जेष्ठ नागरिक यांच्याकरिता शौचालयाची, महामार्ग लगत अत्यंत गरज असल्याचे वारंवार निदर्शनास आणून दिले होते.यानुसार मा.आयुक्त मंगेश चितळे यांच्या आदेशानुसार संबंधित अधिकारी यांच्यासोबत विविध ठिकाणी जागांची पाहणी केली.शेवटी मा.आयुक्त मंगेश चितळे यांच्या संकल्पनेतून व मा. विधाते साहेब यांच्या सहकाऱ्याने महामार्गालगत प्री- फेब्रिकेटेड शौचालय उभारण्यास दि.०६/०१/२०२५ रोजी कार्यादेश देण्यात आला.यानुसार महामार्गालगतच्या गार्डन हॉटेल समोरील सर्विस रोडवर सार्वजनिक शौचालय उभारणीच्या कामास सुरुवात झालेली आहे.पनवेल शहरात येणाऱ्या जाणाऱ्या नागरिक विशेषतः महिला,जेष्ठ नागरिक,युवक युवती यांना याचा लाभ घेता येणार आहे.नागरिकांना स्वस्थ व स्वच्छ जीवन जगण्यासाठी मदत होणार आहे. महामार्गालगतच्या गार्डन हॉटेल समोरील सर्विस रोडवर उभारण्यात येणाऱ्या सार्वजनिक शौचालयाची मा.नगरसेविका डॉ.सुरेखा मोहोकर यांनी पनवेल महानगर पालिका अधिकारी प्रीतम पाटील ,भावेश चंदने



, मुलाणी साहेब,पगारे साहेब व डॉ.विलास मोहोकर यांच्या समवेत पाहणी करून कामाचा आढावा घेतला व महिलांच्या आरोग्यविषयक गरजेच्या वस्तू, सॅनीटरी नॅपकिन वेडिंग व बर्निंग मशीन लावणे,दिव्यांगांसाठी ,जेष्ठ नागरिकांसाठी विशेष सोय करण्यासंबंधी सूचना केल्या.नागरिकांच्या आरोग्य व वैयक्तिक स्वच्छतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या शौचालय उभारणीच्या कामाचा अखंडीत पाठपुरावा करून उभारणीच्या कामास प्रारंभ झाल्याबद्दल नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

द•ख•ल

# सेवा निवृत्ती



**दैनिक युवक आधार-** माझ्या आयुष्यात तो एक दिवस खूप महत्त्वाचा ठरला जेव्हा मी इयत्ता पाचवीसाठी गावातल्याच प्रगती माध्यमिक विद्यालय भामरे, येथे ॲडमिशन घेतले आता माध्यमिक विद्यालय म्हटलं तर डोळ्यासमोर प्रशस्त इमारत खेळाचे मैदान अशा अनेक भौतिक सुविधा समोर येतात परंतु माझ्या शाळेत त्यावेळी त्या सर्व भौतिक सुविधा नव्हत्या, माझी शाळा तेव्हा एका लांबलचक घरात पाच-सहा खोल्या असतील तेथे भरायची. शाळेतील सर्व शिक्षक वृंद आमच्याशी आई-वडिलांप्रमाणेच वागायचे म्हणूनच कदाचित ही शाळा आम्हाला शाळा नसून घर वाटायची. आणि याच शाळेत एक मराठीच्या मॅडम होत्या सौ. एन. एस. पाटील ज्या नेहमीच मला माझ्या आईसारखं जीव लावायचा. मी इयत्ता सहावीत असेल तेव्हा शाळेत 'माझी आई' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित केली होती. बऱ्याच विद्यार्थ्यांनी स्पर्धेत भाग घेतला होता. मी देखील स्पर्धेत निबंध लेखन केले व माझ निबंध लेखन मॅडमांना खूप आवडले मॅडमांनी त्या निबंधाचे खूप कौतुक केले व दुसऱ्या दिवशी सगळ्यांसमोर त्या निबंधाचे वाचन केले. मॅडमांनी दिलेले लेखनाचे कौशल्य प्रस्तावना, विषयाची विस्तृत मांडणी आणि समारोप या सर्व गोष्टींचा मेळ घालून तो निबंध तयार केला होता.

मला मराठी विषयाची आवड अजिबात नव्हती परंतु ज्या पद्धतीने या विषयाची भीती माझ्या मनातून मॅडमांनी अनेक अनेक उदाहरणातून काढून टाकली व नंतर मराठी हा माझा आवडता विषय झाला. मॅडमांच्या प्रेरणेमुळे मी कविता देखील लिहू लागलो. याच लेखन कौशल्याच्या जीवावर आज दैनिक युवक आधार या वर्तमानपत्राचा जळगाव जिल्हा विभागीय पत्रकार व शिक्षक म्हणून देखील कार्यरत आहे. गेली 25 वर्ष आलेल्या प्रत्येक प्रसंगाला तोंड देत एका खेड्या गावात ज्ञानदानाचं पवित्र काम करून माझ्यासारख्या शिक्षक, डॉक्टर, इंजिनिअर, राजकारणी असे अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनाच्या शिल्पकार होऊन आमच्या जीवनाला आकार देण्याचे कार्य मॅडम यांच्या हातून घडले. सौ. एन. एस. पाटील मॅडम आपल्यासारख्या शिक्षिका आमच्या शाळेला व गावाला लाभल्या हे देखील आमचे भाग्यच ! रुजू दिनांक १४/०६/२००० सेवा निवृत्ती दिनांक ३१/०५/२०२५ आपण दिलेल्या दीर्घकालीन सेवेबद्दल आजी-माजी विद्यार्थी तसेच गावकऱ्यांच्या वतीने सेवानिवृत्तीच्या खूप साऱ्या शुभेच्छा. आपले पुढील आयुष्य निरोगी व मंगलमय जावो!

## नवेदर बेलीतील संतोष आणि कल्पना पाटील यांचा अपघाती मृत्यू ; एकुलता एक मुलगा अनाथ

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा.**



अलिबाग तालुक्यातील नवेदर बेली गावात रविवारी सकाळी मानी फाटा येथे झालेल्या भीषण अपघातात गावातील रहिवासी संतोष पाटील (वय ४५) आणि त्यांची पत्नी कल्पना पाटील (वय ४२) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. दोघे मोटरसायकलवरून प्रवास करत असताना समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या इनोवा वाहनाने त्यांना जोराची धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की घटनास्थळीच दोघांचा मृत्यू झाला.या दुर्घटनेने संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे. पाटील दांपत्यांचा एकुलता एक मुलगा या अपघातानंतर पूर्णपणे अनाथ झाला असून, त्याला मोठा मानसिक धक्का बसला आहे. त्याच्या संगोपनाचा आणि शिक्षणाचा प्रश्न आता गंभीर स्वरूप धारण करत आहे. कुटुंबप्रमुख गमावल्याने त्याच्या भविष्यासमोरील अडचणी लक्षात घेता, समाजातील सर्व स्तरांतील नागरिकांनी आणि शासनाने पुढाकार घेणे अत्यंत गरजेचे ठरत आहे.या प्रकरणातून रेवस-अलिबाग मार्गावरील सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अपघातग्रस्त ठिकाण असलेला हा मार्ग अरुंद असून, याठिकाणी अपघात वारंवार घडत आहेत. अपुऱ्या वाहतूक पोलिस बंदोबस्तामुळे वाहनचालकांमध्ये शिस्तीचा अभाव दिसून येतो. रस्त्याचे रुंदीकरण, स्पष्ट वाहतूक नियमन, तसेच ठोस उपाययोजना राबवणे अत्यावश्यक झाले आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लक्ष वेधले जाणे गरजेचे आहे, कारण गृहखाते त्यांच्या अखत्यारित येते. नागरिकांच्या जीवित सुरक्षेचा प्रश्न येथे उभा राहत असून, त्वरित पावले उचलली गेली नाहीत तर अशा दुर्घटना पुन्हा घडू शकतात.गावकरी, सामाजिक संस्था आणि प्रशासनाने या अनाथ बालकाच्या भविष्यासाठी पुढाकार घेत त्याच्या शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी स्वीकारावी, ही भावनिक आणि मानवीतेच्या दृष्टीने गरज बनली आहे

# जसखारगावचे सुपुत्र दामूशेठ घरत महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील**

नालंदा ऑर्गनायझेशन संस्था पुणे यांच्या वतीने उरण तालुक्यातील जसखारगावचे सुपुत्र तथा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दामूशेठ घरत यांना "महाराष्ट्र रत्न पुरस्काराने" गौरविण्यात आले आहे. पत्रकार भवन, नवि पेठ, पुणे येथे आयोजित केलेल्या या समारंभासाठी आय.ए.एस. अधिकारी डॉ. शेषराव पाटील, एआरजे इंडस्ट्रीज ग्रुपचे चेअरमन जितेंद्र दाते, शब्दधन सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा. मनोज वाबळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत दामूशेठ घरत यांना महाराष्ट्र रत्न सन्मान पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. या प्रसंगी दामूशेठ घरत यांचे कुटूंबिय आवर्जून उपस्थित होते.




माजी खासदार लोकनेतेरामशेठ ठाकूर यांचे दामूशेठ घरत हे खंदे समर्थक आहेत. त्यांच्या सरपंच पदाच्या कारकिर्दीत त्यांनी जेएनपीटीमार्फत17 कोटी रुपयांचा टॅक्स ग्रामपंचायतीला मिळवून दिला होता. उरण तालुक्यातील एक आदर्श सरपंच म्हणून त्यांचा नावलौकिक होता. दामूशेठ घरत यांनी आपल्या सरपंच पदाच्या कारकिर्दीत महिला-भगिनींसाठी शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन दिली. गावात पाणपोई आणण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला होता. कोरोना काळात देश संकटात असतानाही आपल्या तब्येतीची पर्वा न करता ग्रामस्थाना सढळ हस्ते जनतेला मदत केली होती. मात्र त्याच काळात त्यांना कोरोनाने गाठले होते. अत्यंत गंभीर अवस्थेतूनही ते सावरले. अहोरात्र जनतेची सेवा करत राहिले. या च गावचे सुपुत्र वी रतू.ह.वाजेकर संस्थापित 12 गाव महालन सभाच्या वतीने तत्कालीन प्रथेप्रमाणेगाव अध्यक्ष प्रथा सुरू होती,मात्र जसखारगावात गावअध्यक्ष पदाची प्रथा गेली २० वर्षे बंद पडली होती, मात्र त्यांतर दामूशेठ घरत त्यांच्या पुढाकाराने पुन्हा गाव अध्यक्षपदाची प्रथा सुरु करण्यात आली. जसखारगावचे आराध्यदैवत असलेल्या रत्नेश्वरी देवीच्या उत्सवात कोणताही गालबोट लागू नये यासाठी ते यात्रा-उत्सव दरम्यान सर्तक राहत होते. नवसाला पावणारी रत्नेश्वरी देवी ग्रामदेवता असल्याने हजारोंच्या संख्येने येथे भाविक येत असतात. दामूशेठ घरत यांनी दरवर्षी हा उत्सव सुखकर व्हावा म्हणून ते सर्तक राहत असतात. गावच्या विकासासाठी कोणतेही हेवेदावेन ठेवता सर्वांना एकत्र आणून गावाचा विकास करण्यासाठी दामूशेठ घरत नेहमी कटिबद्ध असतात. त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना नालंदा ऑर्गनायझेशन तर्फे महाराष्ट्र रत्न सन्मान केल्यामुळे अण तालुक्यातील त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# कलाशिक्षक श्री घाडगे परशुराम यांचा राज्यात तृतीय क्रमांक

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

श्री.छत्रपती हायस्कूल सणसर या विद्यालयाचे कलाशिक्षक श्री परशुराम हरिदास घाडगे यांनी रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडे, यांचे वतीने जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय फलक लेखन स्पर्धेमध्ये राज्यात तृतीय क्रमांक मिळविला. मंगळवार दिनांक 22/ 3 /2025 रोजी स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल तळेगाव दाभाडे या ठिकाणी रोटरी क्लब ऑफ तळेगाव दाभाडेचे संस्थापक तसेच पुणे जिल्हा कला शिक्षक संघाचे अध्यक्ष मा.श्री मिलिंद शेलार सर, महाराष्ट्र राज्य कला शिक्षक संघाचे उपाध्यक्ष मा.श्री किरण सरोदे सर, प्रकल्प प्रमुख रोटरी डॉक्टर नितीन नगरे आणि तळेगाव दाभाडे च्या प्रशासकीय अधिकारी यांच्या शुभ हस्ते प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.आज पर्यंत विद्यालयाचे कलाशिक्षक श्री. परशुराम घाडगे सर यांनीअनेक पुरस्कार मिळविले



आहेत. अनेक स्पर्धांमध्ये यश प्राप्त केले आहे.त्यात आज फलक लेखन स्पर्धेमध्ये राज्यात तृतीय क्रमांक मिळवून विद्यालयाचे नाव उज्वल केले. विद्यालयाच्या वतीने आज बुधवार दिनांक23/4/2025 रोजी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री सर्जे सर यांचे शुभहस्ते श्री.परशुराम घाडगे सर यांचा सन्मान करण्यात आला. श्री.घाडगे सरांनी मिळवलेल्या यशाबद्दल श्री.छत्रपती शिक्षण संस्था माननीय सचिव सर्व संचालक मंडळ गावाचे सरपंच सर्व ग्रामपंचायत सदस्य,पालक व विद्यार्थ्यांच्या वतीने घाडगे सरांचे अभिनंदन करण्यात आले.

# बॉलिवूड स्टार अजय देवगण करणार कल्याण शोरूम्सचे उद्घाटन

### कल्याण ज्वेलर्सचा वाशी आणि कल्याण मध्ये विस्तार

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, वार्ताहर**



२३ एप्रिल २०२५ :- कल्याण ज्वेलर्स या भारताच्या दागिने क्षेत्रातील सर्वात विश्वासार्ह आणि आघाडीच्या ब्रँडने आज नवी मुंबई, वाशी आणि कल्याण येथे दोन नव्या शोरूम्सचे उद्घाटन करत असल्याची घोषणा केली. अभिनेते अजय देवगण, शुक्रवार २५ एप्रिल रोजी सकाळी १०.३० आणि दुपारी १२ वाजता या शोरूम्सचे उद्घाटन करणार आहेत. कल्याण ज्वेलर्स सध्या विविध प्रमुख बाजारपेठांत कार्यरत असून त्यात ठाणे, पुणे, नाशिक आणि इतर बाजारपेठांचा समावेश आहे. या शोरूम्समध्ये कल्याण ज्वेलर्सच्या दागिन्यांच्या कलेक्शनमधील आकर्षक डिझाइन्स जागतिक दर्जाची सजावट असलेल्या वातावरणात पाहायला मिळतील. श्री.रमेश कल्याणरामन, कार्यकारी संचालक, कल्याण ज्वेलर्स म्हणाले,"कंपनी या नात्याने आम्ही लक्षणीय टप्पे पार केले आहेत आणि ग्राहकांचा खरेदीचा अनुभव उंचावण्यासाठी समग्र यंत्रणा उभारण्याच्या दिशेने प्रगती केली आहे. ब्रँड कल्याण ज्वेलर्ससाठी महाराष्ट्र ही महत्त्वाची बाजारपेठ आहे आणि आम्ही सातत्याने या ठिकाणी धोरणात्मक विस्तार करण्यास प्राधान्य दिले आहे. वाशी आणि कल्याण, मुंबईतील आगामी शोरूम्स बाजारपेठेतील आमचे अस्तित्व बळकट करण्याच्या दिशेने आणि ग्राहकांना जास्त सोयीस्कर सेवा देण्यासाठी टाकलेले महत्त्वाचे पाऊल आहे.''

# खावडा वीजवाहिनी प्रकल्पाला गती देण्यासह बाधितांना तात्काळ जमीन मोबदला द्यावा

### भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांची पालघर जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी/भिवंडी**

खावडा IV सी पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड प्रकल्पाच्या कामाला गती देण्यासह बाधित जमीनधारकांना तात्काळ आर्थिक मोबदला देण्याची मागणी भिवंडी ग्रामीणचे आमदार शांताराम मोरे यांनी केली आहे. या वीज प्रकल्पासंदर्भात आणि त्याच्या मोबदल्यासंदर्भात आमदार मोरे यांनी पालघर जिल्हाधिकाऱ्यांना नुकतेच एक निवेदन दिले असून त्याद्वारे आमदार मोरे यांनी ही मागणी केली आहे. खावडा (IV C) पॉवर ट्रान्समिशन प्रकल्पाचे काम हे ऊर्जा क्षेत्रातील नामांकित कंपनी असलेल्या स्टरलाईट पॉवरद्वारे करण्यात येत आहे. या प्रकल्पाद्वारे गुजरातमधील खावडा रिन्यूएबल ऊर्जा क्षेत्राला महाराष्ट्रातील महत्त्वाच्या प्रदेशांना जोडण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यात येत आहे. हा प्रकल्प पूर्णत्वास गेल्यावर केवळ मुंबई महानगर प्रदेश (MMR) आणि पुणे येथील विजेच्या मागण्या पूर्ण करण्यासह वीज खर्च आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासही मोठी मदत करणार आहे. या खावडा (IV C) पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड प्रकल्पाचा मार्ग ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातून जात असून ज्यामध्ये 'राइट ऑफ वे' साठी खासगी मालकीच्या शेतजमिनीचा वापर केला जात आहे. या प्रकल्पाअंतर्गत भिवंडी ग्रामीणमध्ये काही ठिकाणी विजेचे टॉवर आणि वीजवाहिन्या बसवण्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापर केला जात आहे. या प्रकल्पासाठी ज्या स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनीचा वापर केला जात असून त्याच्या मोबदल्याचे मूल्यांकन आणि वितरण जलदगतीने करण्याची आग्रही मागणी आमदार शांताराम मोरे यांनी पालघर जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. दरम्यान वाढत्या ऊर्जेच्या गरजा लक्षात घेता आमदार शांताराम मोरे यांची ही भूमिका पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देण्याच्या राज्य सरकारच्या भूमिकेशी



सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही महाराष्ट्रातील वीज वहन विकासाला गती देण्यासाठी कठोर निर्देश दिले आहेत. १०० दिवसांच्या प्रगती अहवालात मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रासाठी २५ वर्षांचा ऊर्जा आराखडा जारी केला होता. ज्यामध्ये वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी आणि ऊर्जा सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी वीज वहन प्रकल्पांची जलद अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला आहे. या वीज वहन प्रकल्पामध्ये संबंधित शेतकऱ्याची जमीन कायमस्वरूपी संपादित केली जात नसून जमिनीच्या वापरासाठी, बांधकामादरम्यान पिकांच्या नुकसानीसाठी आणि त्यांच्या शेतातून जाणाऱ्या वीजवाहिन्यांच्या परिणामासाठी शेतकऱ्यांना मोबदला दिला जातो. कंपनीला फक्त जमीन मालकांकडून 'राइट ऑफ वे' मिळतो, ज्याद्वारे जमीन शेतकऱ्यांच्या नावावरच राहते आणि सातबारावर कोणताही शिक्का मारला जात नाही. हा प्रकल्प उभारणीचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याच्या टॉवरखाली आणि आजूबाजूला शेतकऱ्यांना पुन्हा शेती करता येते. तर जिल्हा प्रशासनाकडून प्रचलित बाजारभाव आणि स्थानिक मानांकांच्या आधारे नुकसानभरपाईचे दर निश्चित करण्यात येतात. इतकेच नाही तर या प्रकल्पात बाधित जमीनधारकांना पिकांच्या नुकसानीचे पैसे देण्यास सुरुवातही झाली आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला होणारा विलंब कमी करण्याच्या महत्त्वाच्या मुद्द्याकडे आमदार शांताराम मोरे यांनी लक्ष वेधत, त्यातील नुकसानभरपाई प्रक्रियेला प्राधान्य देण्यासह जमीन मालकांना त्यांचे देयके वेळेवर मिळण्याची विनंती पालघर जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. जेणेकरून यातील अडथळे दूर होतील, शेतकऱ्यांचा आत्मविश्वास परत येईल आणि प्रकल्पाचे कामही गतीने सुरू ठेवण्यास मदत होणार आहे. प्रशासकीय समन्वय आणि नुकसानभरपाई या मुद्द्यांवर त्वरित कार्यवाही झाल्यास हा प्रकल्प वेळेवर पूर्ण होईल आणि त्यामुळे शेतकरी समुदाय आणि महाराष्ट्रातील ऊर्जा ग्राहक दोघांनाही फायदा होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पर्यावरणपूरक सेंद्रिय शेतीचे शेतमालक राजुभाऊ इंगळे. ह्यांची यशोगाथा - नरेन्द्र कोवे /अनसिंग

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

जिद्द, चिकाटी व मेहनतीने प्रतिकूल परिस्थितीमध्ये धोक्यात आलेल्या शेती व्यवसायाला आश्चर्यकारक पध्दतीनेप्रगती घडवून आणून , इतरांचाही विकास साधला. विदर्भात येत असलेल्या वाशिम जिल्ह्यातील अनसिंग येथील राजू दगडूजी इंगळे यांची जिद्द व कष्टाच्या जोरावर सेंद्रिय उत्पादक शेतकरी बनून शेतकऱ्यांसाठी एक आदर्श निर्माण केला.त्यांच्या ह्या उपक्रमाला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेबांनी पर्यावरणपूरक सेंद्रिय शेतीला प्राधान्य देऊन शुभेच्छा दिल्या आहे. राजुभाऊ दगडुजी इंगळे रा. अनसिंग ता. जि. वाशिम ह्यांनी सहा ऐकरात निंबोळी अर्क प्रकल्प उभारला आहे. त्यात ते निंबोळी पासून तेल आणि पावडरची निर्मिती करतात.सद्या रासायनिक खतांचे दर आणि त्यांच्या पासून मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे शेतकरी सेंद्रिय शेतीकडे वळतांना दिसून येत आहे.सेंद्रीय कीडनाशक, सेंद्रीय खत वापरणे काळाची गरज बनली आहे. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर राजुभाऊ इंगळे यांनी सेंद्रीय शेतीसाठी उपयुक्त अर्क




आणि गांडूळ खताची निर्मिती आणि विक्री देखील ते करीत आहे.गांडूळ खत दिड ते दोन हजार रुपये क्विंटल भावाने गांडूळ खत तयार करून विक्री केल्या जात आहे. ते गांडूळ बिज केंद्रावर 400 रुपये किलो गांडूळ बिज विक्री करतात. ज्या वनस्पतीचा पालापाचोळा जे जनावर खात नाही, अश्या दहा प्रकारच्या पाल्यापासून ते पिकासाठी अर्क बनवितात. त्याला दशपर्णी अर्क असे म्हणतात. ऐरंडा,बेशरम, रुई, कनेर,करंज, निरगुडी, सीताफळ, टनटनी, कडुनिंब, धोत्रा अश्या वनस्पतीचा पाला घेऊन त्यावर 28 दिवसांची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर त्यापासून निघणाऱ्या दशपर्णी अर्काचा ते भाजीपाला, गहू आणि फळबागेतील पिकावरती फवारणी करतात. साहजिकच त्यामुळे त्यांच्या पीक उत्पादनाला सुद्धा डिमांड वाढली आहे. शेतीच्या निष्ठासाठी शेतकरी परावलंबी झाल्याने शेतीचा खर्च आणि त्यापाही होणारा त्रास वाढला आहे.ह्यावर सेंद्रीय शेती आणि सेंद्रिय निर्विष्ठा निर्मितीने पर्याय शोधला आहे. राजू इंगळे ह्यांना कृषी विभागाकडून प्रशिक्षण देवून त्यांना अनुदानावर मशीन काही यंत्रणा दिल्या आहेत. त्यामुळे खर्च कमी झाला आहे. सात रुपये दराने ते निंबोळी खरेदी करतात. ह्यामाध्यमातून ग्रामस्थांना सुद्धा रोजगार मिळाला आहे. त्यातून त्यांना वार्षिक दिड ते दोन लाखाचा नफा मिळतो आहे. वर्मी कंपोस्ट विषयी मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस साहेबा सोबत राजुभाऊ इंगळेचा संवाद पर्यावरणपूरक सेंद्रीय शेती संदर्भात घेण्यात आलेल्या ' लोकसंवाद 'ह्या कार्यक्रमामध्ये मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब सांगतात, 'सेंद्रीय शेतीची फार आवश्यकता आहे. ह्या संदर्भात आपण मिशन उभे केले आहे. आम्हाला ज्या -ज्या वेळेस गरज भासेल, त्या-त्या वेळेस आम्ही पण आपला उपभोग घेऊ 'असे लोकसंवाद कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी राजुभाऊ इंगळे ह्यांना स्पस्ट सांगितले. प्रगतशील शेतकरी राजु इंगळे हे पंचक्रोशीतल्या शेतकऱ्यांना रासायनिक खते आणि कीटकनाशका पासून प्रवृत्त करून पर्यावरणपूरक सेंद्रिय शेतीकडे वळवीत आहे. त्यांचा हा आदर्श वाखाळण्याजोगा आहे.

निंबुळी शेतकरी म्हणून स्वतःच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी संघर्ष करत असतांना त्यांनी प्रोजेक्ट उन्नती निंबुळी अंतर्गत शाश्वत पद्धतीचा अवलंब केला.

शेतकरी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा महत्वाचा कणा आहे. आपल्या देशात शेतकरी हा महत्वाचा घटक आहे. देशाचे पोषण करण्यासोबतच ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासाला चालना देण्याचे काम पण शेतकरी करीत आहे. राजाभाऊ इंगळे यांच्या यशोगाथामधून स्थिरता, नाविन्यता व सामुदायिक पाठींब्याची ताकद निदर्शनास येते.

# रसायनी पोलीस स्टेशन झाले स्मार्ट

### रसायनी पोलीस स्टेशनला आय एस ओ नामांकन मिळाल्याबद्दल पोलीस निरीक्षक संजय बांगर व त्यांच्या सहकाऱ्यांचे पत्रकारांनी केले अभिनंदन



**दैनिक युवक आधार**
**रसायनी आनंद पवार**

'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे ब्रीदवाक्याचे पालन करत पोलीस दल कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतात.पोलीस स्टेशन फक्त गुन्हे नोंदवण्याचे ठिकाण नसून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी व त्यांना सर्वतोपरी मदत होण्याच्या दृष्टीने एक सुसज्ज केंद्र बनविण्याच्या हेतूने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सर्वसामान्य जनतेला कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही पोलीस ठाण्यात येणारे तक्रारदार व सामान्य नागरिकांना सर्वोत्तम सेवा सुविधा प्रदान करण्याच्या हेतूने रायगड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे स्मार्ट कसे होतील याबाबत जिल्ह्यातील सर्व पोलीस अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून सूचना दिल्या होत्या. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अप्पर पोलीस अधीक्षक विजय शिवथरे,खालापूर पोलीस उपविभागीय अधिकारी विक्रम कदम यांच्या मार्गदर्शना नुसार रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांनी आपले सहकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव,पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर,प्रकाश माळी,अनुसया ढोणे,व सर्व ठाणे अंमलदार पोलीस कर्मचारी यांच्या अथक प्रयत्नाने निकषाची पूर्तता केल्याने रसायनी पोलीस ठाण्याला नुकताच आयएसओ9001:2015 नुसारA++हा मानाचा दर्जा रसायनी पोलीस ठाण्याला प्राप्त झाल्याने बुधवार (दि२३) रोजी रसायनी पत्रकार संघाच्या वतीने रसायनी टाइम्सचे संपादक अनिल भोळे,ज्येष्ठ पत्रकार बी.एस. कुलकर्णी,आनंद पवार, लोकमतचे बाळासाहेब सावर्डे सर,यांनी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर व त्यांच्या सहकार्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

दखल

## रेवदंडा पोलिसांची कारवाई ; तीन आरोपींविरुद्ध शस्त्रबंदी कायद्यानुसार गुन्हा दाखल, कार व हत्यारे जप्त

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



रेवदंडा पोलिसांना रात्री मिळालेल्या गुप्त माहितीनंतर केलेल्या तात्काळ कारवाईत तीन आरोपींविरुद्ध भारतीय शस्त्र अधिनियम १९५१ चे कलम ४ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संबंधित आरोपींना अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून एक चारचाकी कार तसेच विविध हत्यारे जप्त करण्यात आली आहेत.या प्रकरणात पंजाब पोळे, पोलिस शिपाई यांनी फिर्याद दाखल केली असून पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे ₹१,५२,००० इतकी असल्याची माहिती आहे.सदर प्रकरणाचा तपास सुरु असून आरोपींना न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. पोलिसांकडून यामागील अधिक तपशील मिळविण्यासाठी पुढील तपास केला जात आहे.

## रेवदंडा मनसेच्या तत्काळ कारवाईने स्थानिक तरुणांना नोकऱ्या परत मिळाल्या

### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा हिसका दाखवतात पाच मिनिटात मराठी कामगारांना कामावर हजर

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**




रेवदंडा येथे एमएमसी सिक्युरिटीच्या रस्त्यावरील कामावरून दोन स्थानिक मराठी तरुणांना हटवल्यानंतर, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या झंझावाती हस्तक्षेपामुळे त्यांना पुन्हा नोकऱ्या बहाल करण्यात आल्या. चेतन साळुंखे व महेश (काका) म्हात्रे या स्थानिक तरुणांना परप्रांतीय सुपरवायझरकडून कामावरून काढण्यात आले होते. स्थानिकांच्या मते, संबंधित सुपरवायझरने आपल्या उत्तर भारतीय नातेवाईकांना कामावर ठेवण्यासाठी रेवदंडा परिसरातील मराठी कामगारांना हटवले. ही घटना समजताच, स्थानिकांनी मनसेच्या अलिबाग तालुका अध्यक्ष सिद्धू म्हात्रे यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी घटनास्थळी तातडीने धाव घेत "मनसे स्टाईल"मध्ये केवळ पाच मिनिटांत दोघांना पुन्हा नोकरीवर हजर करून घेतले.या संदर्भात मनसेने स्पष्ट केले की, "महाराष्ट्रात मराठी माणसांवर अन्याय सहन केला जाणार नाही. स्थानिकांना कामावरून हटवण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना आम्ही जागेवरच योग्य उत्तर देऊ."मनसेच्या या वेळीच झालेल्या कारवाईमुळे रेवदंडा परिसरातील स्थानिक युवकांमध्ये समाधानाचे वातावरण असून, मराठी अस्मितेसाठी मनसेचा ठाम आणि लढवय्या पवित्रा पुन्हा एकदा दिसून आला आहे.

## पहलगाम मधील दहशतवादी हल्ल्यात पनवेलमधील दिलीप देसले मृत्युमुखी.

### कामोठेमधील माणिक व सुबोध पाटील पती पत्नी जखमी

दैनिक युवक आधार
पनवेल प्रतिनिधी

जम्मू काश्मीर येथील पहेलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात नविन पनवेल सेक्टर १२ येथील दिलीप देसले मृत्युमुखी झाले आहेत. तर कामोठे येथील सुबोध पाटील आणि माणिक पाटील हे पती–पत्नी जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांना श्रीनगर येथील हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती ठीकठाक आहे. अमरनाथ यात्रेसाठी पनवेलमधून निसर्ग ट्रॅव्हल्स द्वारे ३९ पर्यटक रवाना झाले होते. २१ एप्रिल ते ३० एप्रिल दरम्यान निसर्ग ट्रॅव्हल्स आयोजित अमरनाथ यात्रा निघाली होती. या यात्रेत पनवेल येथील ३९ पर्यटक सहभागी झाले होते. पर्यटकांना पहलगाम येथे गाठून मंगळवारी दहशतवाद्यांनी हल्ला केला. या ठिकाणी आलेल्या पर्यटकांना त्यांचे नाव आणि धर्मविचारत गोळ्या झाडण्यात आल्या. या हल्ल्यात नविन पनवेल येथील दिलीप देसले हे गोळीबारात ठार झाले. तर कामोठेमधील माणिक पाटील आणि त्यांच्या पत्नी सुबोध पाटील या जखमी झाल्या आहेत. त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती प्रशासनातर्फे देण्यात आली...

## शहर शिवारातील शेतकऱ्यांना पिक विमा नाकारला; आयसीआयसीआय लोम्बार्ड कंपनीचा अजब निर्णय

**दैनिक युवक आधार**
**डॉ.गणेश थोरे ,**
**परभणी जिल्हा प्रतिनिधी**



परभणी जिल्ह्यातील सेलू तालुक्यात आयसीआयसीआय लोम्बार्ड पिक विमा कंपनीने शेतकऱ्यांच्या मनात संभ्रम निर्माण करणारा अजब फर्मान काढला आहे. सेलू शहर शिवारात शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा पीक विमा नाकारण्यात आला असून, नुकसानीची भरपाई मिळवण्यासाठी तक्रार केल्यानंतरही विमा कंपनीचे अधिकारी समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. यासंदर्भात पीक विमा प्रतिनिधी झाडे साहेब यांना विचारणा केली असता, शासनाच्या निर्देशानुसार शहर शिवारातील शेतकऱ्यांचा विमा रिजेक्ट केल्याचे सांगण्यात आले. मात्र, यामागचे स्पष्ट कारण विचारले असता त्यांच्याकडे उत्तर नव्हते. या संपूर्ण प्रकाराची चौकशी करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी काळे साहेब यांना विचारणा केली असता, त्यांना अशा कोणत्याही शासन आदेशाची माहिती नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यांनी हा विषय पुढील कार्यवाहीसाठी कृषी आयुक्तांकडे पाठवण्याचे आश्वासन दिले. या वेळी भारतीय जनता पक्षाचे डॉ. गणेश थोरे, श्री कपिल फुलारी, श्री विशाल लोया, श्री बाळू काबरा आणि अन्य शेतकरी उपस्थित होते. डॉ. थोरे यांनी प्रश्न उपस्थित केला की, जर शेतकऱ्यांचा विमा नाकारायचाच होता, तर कंपनीने त्यांच्याकडून विमा प्रीमियम का स्वीकारले? आणि नुकसान झाल्यानंतर पंचनामा का करण्यात आला? शेतकऱ्यांच्या पिक विम्याचा असा मनमानी नकार हा सरळ फसवणुकीचा प्रकार असून, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात तात्काळ चौकशी होणे गरजेचे आहे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

## जरीमरी देवी मंदिरातील चोरी प्रकरणी एकाला घेतले ताब्यात

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: पनवेल शहरातील जरीमरी देवी मंदिरात एका चोरट्याने चोरी करून दान पेटीतील रोख रक्कम लंपास केली. याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी एका आरोपीला ताब्यात घेतले आहे. आकाश चरण (32 रा.पनवेल) असे त्याचे नाव आहे.

व्हि.के.हायस्कूल रस्त्यालगत असलेल्या जरीमरी देवी मंदिराचा मुख्य दरवाजा तोडून अज्ञात चोरट्याने आत प्रवेश केला आणि मंदिरातील दान पेटी लोखंडी रॉडने तोडून त्यातील अंदाजे 3 हजार रुपये चोरून नेले. चोरीचा हा सर्व प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाला. या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पनवेल शहर पोलिसांनी आरोपी आकाश चरण याला ताब्यात घेतले.



## शिरुर अनंतापाळ शहरामध्ये विविध विकास कामांचे भूमिपूजन संपन्न...

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर**



**लातुर शिरुर अनंतपाळ** : नगरपंचायत अंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या विशेष प्रयत्नातून मंजुर असलेल्या 5 कोटी 70 लक्ष रुपयांच्या विविध विकास कामांचे भूमिपूजन माजी. पालकमंत्री तथा निलंगा विधानसभा मतदार संघांचे आ. संभाजीराव पाटील निलंगेकर व राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अतुल माने पाटील होते,तर मंचावर नागराध्यक्षा मायावती धुमाळे,पाणी पुरवठा सभापती उमाकांत देवंगरे,माजी सभापती धोंडीराम सांगवे, मंगेश पाटील,विठ्ठलराव पाटील,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे कार्यालयीन सचिव अमरजीत पाटील,माजी. कृषी सभापती गोविंदराव चिलकुरे,शहराध्यक्ष अनिल देवंगरे अर्थ व नियोजन सभापती संतोष शिवणे,नगरसेविका जयश्री आवाळे,श्रीदेवी संभाळे,श्यामल शिंदे, राजकुमार पाटील, माधव बिरादार उपस्थीत होते. यावेळी बोलताना आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी शहर विकासाकरीता महायुती सरकार कटीबद्ध असुन भविष्य काळात शहरातील रस्ते, नाली व शहर सुशोभीकरणा करीता निधीची कमतरता भासणार नाही असे प्रतिपादन केले तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण म्हणाले राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री अजीत दादा पवार यांच्या माध्यमातून हा 5 कोटी 70 लक्ष रुपयांचा निधी मिळाला आहे भविष्य काळात शहराला विकासाच्या प्रगती पथावर आणण्याकरीता अर्थमंत्री अजीत दादा यांच्या माध्यमातून आणखी निधी शिरुर अनंतपाळ तालुक्याकरीता आणू,शहरातील महात्मा बसवेश्वर महाराज यांचा पुतळा पुढील वर्षभरात उभारू अशी शास्वती यावेळी बोलताना त्यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अब्दुल अजीज मुल्ला यांनी केले,सूत्रसंचालन महेताब शेख यांनी केले आणि आभार संतोष शिवणे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी सुचित लासूने,उदय बावगे,मधुकर धुमाळे,संदीप सगरे, नवाज चौधरी, ऋत्विक सांगवे,चंद्रकांत कांबळे, खंडू लोहार,आदींनी परिश्रम घेतले.

## ठाकरे सेनेच्या उत्तर रत्नागिरी जिल्हाप्रमुखपदी बाळाराम खेडेकर

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण वार्ताहर**



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशाने शिवसेनेच्या उत्तर रत्नागिरी जिल्हाप्रमुखपदी माजी नगरसेवक बाळाराम खेडेकर तर तालुकाप्रमुखपदी दत्ताराम भिलारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शहरप्रमुखपदी चंद्रशेखर पाटणे यांची निवड करण्यात अली आहे. बाळाराम खेडेकर एक गेल्या काही वर्षांपासून सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. या क्षेत्रात आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. खेड नगर परिषदेचे नगरसेवक पद भूषवताना माजी समाज कल्याण समिती सभापती पदी कार्यरत होते. या पदांच्या माध्यमातून खेड शहराच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. तसेच खेडेकर यांच्याकडे वक्तृत्व व संघटन कौशल्य आहे. विशेष म्हणजे शिवसेनेशी एकनिष्ठ राहिले आहेत. या सर्व कामगिरीची दखल घेऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी उत्तर रत्नागिरी जिल्हाप्रमुख पदी बाळाराम खेडेकर यांची निवड केली आहे. या निवडीबद्दल प्रतिक्रिया देताना खेडेकर म्हणाले की, शिवसेना बळकटीसाठी तळागाळापर्यंत पोहचून ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेत विखुरलेल्या कार्यकर्त्यांना एकसंघ करणार असल्याचे यांनी सांगितले. या निवडीबद्दल तालुका शिवसेनेच्यावतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या निवडीबद्दल बाळाराम खेडेकर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## उन्हाळ्यात पाण्याचा जपून वापर करा;मुख्याधिकारी यांचे नागरिकांना आवाहन!

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर..**



सध्या तापमानात झपाट्याने वाढ होत असून संपूर्ण शहरात उन्हाळ्याची तीव्रता जाणवू लागली आहे. या पार्श्वभूमीवर नगर परिषद रिसोडचे मुख्याधिकारी तथा कर्तव्य कठोर प्रशासक सतिश शेवदा यांनी नागरिकांना पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले आहे. शेवदा म्हणाले की, "उन्हाळ्यात जलस्त्रोतांवर प्रचंड ताण येतो. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने जबाबदारीने वागून पाण्याचा अपव्यय टाळावा." तसेच त्यांनी नळाच्या गळणाऱ्या तोट्यांची तातडीने दुरुस्ती करण्याचे आवाहनही केले. "घराबाहेर नळ सुरू ठेवणे, गाड्या धुण्यासाठी जास्त पाणी वापरणे किंवा बागेला अत्याधिक पाणी देणे टाळा. प्रत्येक थेंब मोलाचा आहे," असे ते म्हणाले. नगर परिषदेकडून विविध उपाययोजना राबवण्यात येत असून, पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी कर्मचारी सज्ज आहेत. मात्र, प्रशासनाची जबाबदारी जितकी महत्त्वाची आहे, तितकीच नागरिकांची सहभागिता देखील आवश्यक आहे, असेही प्रशासक यांनी स्पष्ट केले. पाणी वाचवण्यासाठी काही सूचनाही त्यांनी स्पष्ट केल्या आहेत ज्यामध्ये नळाच्या गळक्या( तोट्यांची त्वरित दुरुस्ती करावी.ब्रश करताना नळ सतत सुरू ठेवू नये.वापरलेल्या पाण्याचा पुनर्वापर करावा (उदा. भांडी धुण्याचे पाणी झाडांना).सकाळी किंवा संध्याकाळीच झाडांना पाणी द्यावे. पाण्याच्या टाक्या लवकर भरल्या तरी पंप बंद करावे. जागरूक नागरिकच पर्यावरणाचे रक्षण करू शकतात. नगर परिषद रिसोडने यासाठी जनजागृती मोहीमही सुरू केली आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातूनही नागरिकांपर्यंत संदेश पोहोचवण्यात येत आहेत.

शेवदा यांनी शेवटी सांगितले की, "उन्हाळ्यातील संकट टाळायचे असेल तर पाण्याच्या थेंबथेंबाची किंमत समजून वापर करणे आवश्यक आहे. आपला एक छोटासा प्रयत्न संपूर्ण समाजासाठी मोठा आदर्श ठरू शकतो."

## चिखलगाव आश्रम शाळेत परदेशी पाहुण्यांकडून गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप कार्यक्रम संपन्न.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे.**



चिखलगाव (ता.खेड) येथील शासकीय माध्यमिक आश्रम शाळा येथे कॅनडा येथील खेड तालुक्यातील कडधे व कान्हेवाडी येथील कामा निमित्त परदेशी असलेल्या तरुणांच्या वतीने आदिवासी बहुल भागातील चिखलगाव आश्रम शाळेतील होतकरू गरीब गरजू विद्यार्थ्यांना मोफत सायकलीचे वाटप करण्यात आले. खेड तालुक्यातील कडधे व कान्हेवाडी येथील उच्च शिक्षित तरूण भावेश निकम, राहुल नाईकडे, स्वप्निल कोबल, प्रियांका नाईकडे हे कामानिमित्ताने कॅनडा या देशात राहतात परंतु लहान पणा पासून आता पर्यंत त्यांची नाळ जोडलेली आहे त्यातून उतराई होण्यासाठी या तरुणांनी शासकीय माध्यमिक आश्रम शाळा येथील गरजू पायी ये जा करणाऱ्या १७ विध्यार्थी यांचे करिता ८५ हजार रुपये किमतीच्या सायकली चे वाटप करण्यात आले. या प्रसंगी लु हेडरसन (इंग्लंड), अदिती गोयल (गुजरात), माजी सरपंच बाळासाहेब गोपाळे, रोहिदास नाईकडे, मुख्याध्यापक योगेश वाघोले, आनंदा मांजरे, नरेंद्र बोरदे, अर्चना कांबळे, सुनील मावळे शाळेचा सर्व स्टॉप, ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व भविष्यामध्ये सर्व गरजू विद्यार्थ्यांना सायकली पुरवण्याचा आश्वासन यांनी दिले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन आनंद मांजरे यांनी केले तर आभार नरेंद्र बोरदे यांनी मानले.

## उल्हास प्रभात राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा 2025 संपन्न

**दैनिक युवक आधार**
**बदलापूर वार्ताहर**




बदलापूर मधून 31 वर्षापासून प्रसिद्ध होणारे वृत्तपत्र उल्हास प्रभात चा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा नुकतेच संपन्न झाला या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे, बदलापूर–अंबरनाथ बिल्डर असोसिएशनचे अध्यक्ष संजय जाधव, सकाळचे मुख्य संपादक राहुल गडपाले, उल्हास प्रभातचे संपादक डॉ. श्री. गुरुनाथ बनोटे यांच्यासह विशेष पुरस्कार विजेते चंद्रकांत खडकबाण, कैलास मनोरे, रवी कुंभार, गजानन टोहके, एड. संतोष मळवीकर, देवेसिंग राजपूत, डॉ. चित्रलेखा माने व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या राज्यभरातील 70 जणांना विविध पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अध्यक्षीय भाषणात आमदार किसन कथोरे यांनी सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे कौतुक करत अशी व्यक्तिमत्व समाजासमोर आणण्याचे काम करणाऱ्या उल्हास प्रभात चे संपादक डॉ. गुरुनाथ बनोटे यांचे कौतुक केले गेली 12 वर्षापासून महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींना समाज रत्न, आरोग्य रत्न, शिक्षण रत्न अशा विविध प्रकारचे पुरस्कार देऊन गौरविण्यात येत आहे. राज्यभरातून आलेल्या दिवाळी अंकांमधून 13 दिवाळी अंक निवडण्यात आले यामध्ये प्रथम क्रमांक अवतरण सकाळ मुंबई, द्वितीय क्रमांक उद्याचा मराठवाडा नांदेड, तृतीय क्रमांक अपेक्षा कोथरूड पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक फोर्ट ट्रस्ट कामगार मुंबई ,सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक वेदांत श्री पुणे, सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक जमाना धमाका अहमदनगर, रणांगण नवी मुंबई, नृत्यवकाश पुणे, साहित्य सवाना नाशिक, सुभाषित नाशिक , पुरुष स्पंदन मुंबई, अर्थशक्ती मुलुंड यांना उत्कृष्ट व सर्वोत्कृष्ट पुरस्कार देऊन गौरविण्यात आले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुकेश दामोदरे यांनी केले तर कार्यक्रमाची प्रस्तावना आरती नेरपगार यांनी केले या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत सुगंधा बनोटे, सहसंपादक अतुल नेरपगार, गौरव बनोटे, गुरुनाथ तिरपनकर, प्रमोद हरपुडे, सौरभ बनोटे, भावेश चंद्रा आदींनी अथक परिश्रम घेऊन हा कार्यक्रम पार पडला. हा सोहळा काटदरे मंगल कार्यालयात पार पडला.

## 'संविधान गुण गौरव' परीक्षेत माणगांव तालुक्यातील हजारो विद्यार्थ्यांनी घेतला सहभाग

### शासनाच्या "घर घर संविधान" निर्णयाची अंमलबजावणी करण्यात माणगांव तालुका अग्रेसर

**दैनिक युवक आधार**
**बोरघर / माणगांव**
**( विश्वास गायकवाड )**

संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घरोघरी संविधानिक मूल्ये पोहोचावीत या उद्देशाने महाराष्ट्र शासनाने पारित केलेल्या 'घर घर संविधान' या निर्णयाची अंमलबजावणी मा. गटशिक्षणाधिकारी आदरणीय सुरेखा तांबट मॅडम यांच्या नेतृत्वाखाली रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुक्यात नाविन्यपूर्ण पद्धतीने विविध उपक्रम राबवून करण्यात येत आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून आज माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांमधील इयत्ता तिसरी ते अकरावी पर्यंतच्या सर्व इच्छुक विद्यार्थ्यांची बहुपर्यायी स्वरूपाची एक 'संविधान गुण गौरव परीक्षा' आयोजित करण्यात आली होती. सदर उपक्रमात हजारो विद्यार्थ्यांनी स्वेच्छेने सहभाग नोंदवला. गेल्या चार महिन्यांपासून माणगाव तालुक्यातील सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांच्या परिपाठादरम्यान सर्व विद्यार्थ्यांना संविधानाच्या प्रत्येक अनुच्छेदाविषयी साध्या सोप्या भाषेत विश्लेषण करणाऱ्या 'आपले संविधान...' या संविधान अभ्यासक नुरखाँ पठाण सर लिखित लेखमालेच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येत होते. याच लेखमालेवर आधारित अभ्यासक्रम सदर परीक्षेसाठी निश्चित करण्यात आला होता. अशाप्रकारे नावीन्यपूर्ण पद्धतीने 'घर घर संविधान' या शासन निर्णयाची अंमलबजावणी करणारा रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका हा महाराष्ट्र राज्यातील कदाचित एकमेव तालुका असावा. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी गटशिक्षणाधिकारी आद. सुरेखा तांबट मॅडम, विस्तार अधिकारी आद. कुमार खामकर सर, आद. धुळदेव कोळेकर सर, आद. शंकर शिंदे सर, सर्व मा. केंद्रप्रमुख, संविधान अभ्यासक आद. नुरखाँ पठाण सर, सर्व साधन व्यक्ती, सर्व व्यवस्थापनाच्या सर्व शाळांचे मा. मुख्याध्यापक व शिक्षक बंधू भगिनींनी यशस्वी प्रयत्न केले.





## चिपळूण नागरीच्या कर्मचाऱ्यांच्या शाखातंर्गत ३० एप्रिल व १ मे रोजी क्रिकेट स्पर्धा

### संस्थापक चेअरमन सुभाषराव चव्हाण यांच्या हस्ते होणार उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण वार्ताहर**

चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेच्या शाखा अंतर्गत क्रिकेट स्पर्धा दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील होणार असून ही स्पर्धा ३० एप्रिल व १ मे रोजी चिपळूण नगर परिषदेच्या पवन तलाव मैदानावर प्रकाशझोतात होणार असून या स्पर्धेचे उद्घाटन ३० एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता संस्थेचे संस्थापक चेअरमन सुभाषराव चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी सौ. स्वप्ना यादव यांनी दिली. चिपळूण नागरी सहकारी पतसंस्था ही एक महाराष्ट्रातील अग्रगण्य पतसंस्था आहे. या संस्थेच्या रत्नागिरी जिल्ह्यासह रायगड, सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ५० शाखा कार्यरत आहेत. या ५० शाखांमध्ये जवळपास २५८ हुन अधिक कर्मचारी व ६५ हुन अधिक अल्पबचत प्रतिनिधी, ४९ सराफ व १ हजार १०७ हून अधिक समन्वयक कार्यरत असून अत्यंत सेवाभावी वृत्तीने काम करणारा वर्ग म्हणून या संस्थेच्या कर्मचाऱ्यांचा नाव लौकिक आहे. कर्मचाऱ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी संस्थेमार्फत विविध उपक्रम राबवले जातात. यामध्ये सर्वोत्कृष्ठ काम करणारे शाखाधिकारी, सर्वोत्कृष्ठ काम करणारे वसुली कर्मचारी यांचा खास यथोचित सत्कार केला जातो. सर्व कर्मचाऱ्यांना चांगल्या कामाबाबत वर्षात एकुण चार पगार भेट म्हणून दिली जाते. अशा पद्धतीने त्यांचे कौतुक करीत असतानाच अधिकारी व कर्मचारी वर्गाच्या कला गुणांना वाव मिळण्यासाठी संस्थेच्या वर्धापन दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमासह तर कामगार दिनाच्या पार्श्वभूमीवर गेली २०१७ पासून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यानुसार दरवर्षीप्रमाणे दि. ३० एप्रिल व १ मे २०२५ रोजी या कालावधीत संस्थेच्या सात विभागाच्या शाखांतर्गत कर्मचाऱ्यांच्या आठ संघामध्ये ही स्पर्धा होणार आहे. तसेच कर्मचारी संघ विरुद्ध संचालक मंडळ संघ अशा लक्षवेधी सामन्याचे दि. १ मे रोजी आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा क्रिकेट क्षेत्रातील क्रिडापटुना व क्रिकेटची आवड असणाऱ्या क्रिडा रसिकांना एक प्रकारचे आकर्षण असेल. या स्पर्धा चिपळूण नगरपालिकेच्या पवन तलावावरील स्टेडीअमवर ३० एप्रिल व १ मे रोजी दोन दिवस ही स्पर्धा प्रकाशझोतात होणार असून रात्री १० वाजेपर्यंत चालणार आहेत. विजेत्या संघाला व उपविजेता संघाला आकर्षिक शिल्ड देण्यात येणार आहे. संस्थेच्या नाविन्यपुर्ण उपक्रमास क्रिडा रसिकांनी व संस्थेच्या चाहत्यांनी उपस्थित राहुन कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन चिपळूण नागरी पतसंस्थेच्या व्यवस्थापनाने केले आहे.

# उच्च न्यायालय गठित समितीवर शिरीष देशपांडे

## विमानतळांवरील सुविधांसाठी तज्ज्ञांची समिती



**मुंबई :** मुंबई उच्च न्यायालयाने दोन याचिकांवर सुनावणी दरम्यान तीन तज्ज्ञांची एक समिती गठित केली आहे. ग्राहक प्रतिनिधी म्हणून मुंबई ग्राहक पंचायतीचे कार्याध्यक्ष ॲड. शिरीष देशपांडे यांची नेमणूक करण्यात आली आहे.

या समितीने सर्व संबंधित घटकांची चर्चा करून देशातील विमानतळांवरील प्रवाशांसाठी असलेल्या सुविधांबाबत सरकारला शिफारसी करणे अपेक्षित आहे. सदर समिती ही आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती श्री रघुराम यांच्या अध्यक्षतेखाली काम करेल, अशी माहिती पंचायतीच्या कार्यवाह अनिता खानोलकर यांनी दिली.

हवाई प्रवाशांना मूलभूत सुविधा पुरवून देशातील विमानतळांनी आदर्श निर्माण करायला हवा, असे सांगत विमानतळांवर व्हीलचेअर अभावी प्रवाशांची अजिबात गैरसोय होता कामा नये, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदविले होते.

आवश्यक तेव्हा व्हिलचेअर मिळणे हा संबंधित ग्राहकांचा हक्कच आहे आणि ते स्वतःहून पुरवणे हे नागरी विमान वाहतूक संचालनालय तसेच संबंधित विमान कंपन्यांचेही कर्तव्य आहे, असे मत व्यक्त करत याविषयी विमानतळांचे व्यवस्थापन करणारी प्रशासने आणि सर्व विमान कंपन्यांनी संवेदनशील असायलाच हवे, अशी टिपणी न्यायालयाने केली होती.

# मोतीलाल नगर रहिवाशांचे ‘की टू की’ पुनर्वसन होणार

## म्हाडा उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांचे आश्वासन



**मुंबई :** गोरेगाव मधील मोतीलाल नगरच्या रहिवाशांचे ‘की टू की’ पुनर्वसन केले जाईल. कुणालाही ट्रान्झिट कॅम्पमध्ये पाठवायची गरज नाही, असे आश्वासन म्हाडाचे उपाध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल यांनी मोतीलाल नगरच्या शिष्टमंडळाला दिले. रहिवाशांना विश्वासात घेऊन हा प्रकल्प पूर्ण करू, रहिवाशांच्या २००० चौरस फूट घराच्या मागणीचे निवेदन सरकारकडे पाठवणार असल्याचेही आश्वासन म्हाडा उपाध्यक्षांनी दिले.

मोतीलाल नगरच्या पुनर्विकासाबाबत हायकोर्टाने दिलेल्या निकालानुसार म्हाडा उपाध्यक्षांना जबाबदार धरण्यात आले आहे. हा पुनर्विकास करताना कायदा आणि नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, असे संजीव जयस्वाल यांनी शिष्टमंडळाला सांगितले.

पुनर्वसन प्रकल्प प्रक्रियेसाठी मोतीलाल नगरमध्ये होणारे सर्वेक्षण वगैरेबाबत माहिती दिली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. रहिवाशांची २,००० हजार कार्पेट चौरस फुटाची मागणी, कॉर्पस फंड, पार्किंग, या मागण्यांचे निवेदन सरकारकडे पाठवू असेही उपाध्यक्षांनी सांगितले.

# मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे जनता दरबार

## पहिल्याच जनता दरबार दिनात ५४ तक्रारींवर सुनावणी

**मुंबई :** जनसामान्यांच्या समस्यांकडे तत्काळ लक्ष देत त्यांचे निवारण करण्याच्या उद्देशाने ‘म्हाडा’च्या मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळातर्फे मंगळवारी जनता दरबार दिनाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये ५४ तक्रार अर्जांवर सुनावणी घेण्यात आली.

वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयातील भारतरत्न गुलजारीलाल नंदा सभागृहात मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मुख्य अधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली जनता दरबार दिन आयोजित करण्यात आला होता.

या जनता दरबार दिनात, वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहून पुनर्वसन सदनिका न मिळणे, उपकरप्राप्त इमारतीचा पुनर्विकास होऊन देखील पुनर्वसन सदनिका न मिळणे, पुनर्विकसित इमारतीला भोगवटा प्रमाणपत्र न मिळाल्याने पुनर्वसन सदनिकांचा ताबा न मिळणे, पुनर्विकासासाठी जाणाऱ्या उपकरप्राप्त इमारतींमधील भाडेकरू/रहिवासी यांच्या कागदपत्रांची तत्काळ पडताळणी करणे आदी मुद्द्यांवरील तक्रारी उपस्थित करण्यात आल्या. शंभरकर यांनी सर्व अर्जदारांचे म्हणणे ऐकून घेऊन, संबंधित अधिकाऱ्यांना तत्काळ व योग्य कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

# काँग्रेसची ‘संविधान बचाव’ व ‘सद्भावना यात्रा’

## २९ एप्रिलला नाशिक, तर ४, ५ मे रोजी परभणीत



**मुंबई :** राज्यात संविधान बचाव व सद्भावना यात्रा काढण्यात येणार आहे. २९ एप्रिलला नाशिक येथे सद्भावना यात्रेचे आयोजन केले असून १ मे रोजी सद्भावना सत्याग्रह तर ४ व ५ मे रोजी परभणी येथे ‘सद्भावना यात्रा’ व ‘संविधान बचाव’ यात्रेचे आयोजन केले आहे, अशी माहिती काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली. पक्ष राज्यात मजबूत करण्यासाठी जिल्हाध्यक्ष यांनी आपल्या ब्लॉकमध्ये महिन्यात १० दिवस फिरावे, असा कानामंत्र पदाधिकाऱ्यांना काँग्रेस पक्षाने दिला आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने २०२५ हे वर्ष संघटन वर्ष घोषित केले आहे, त्याअनुषंगाने संघटना मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे. पक्षाची पदे असणाऱ्यांना पक्षासाठी वेळ द्यावा लागेल. जिल्हाध्यक्षांनी महिन्यातून किमान १० पूर्ण दिवस वेगवेगळ्या ब्लॉकमध्ये फिरावे, पक्षाने दिलेल्या आंदोलनात्मक कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी, महिन्यातून किमान १ बैठक घेतली पाहिजे. तर ब्लॉक अध्यक्षांनी महिन्यातून किमान ८ पूर्ण दिवस प्रभागांमध्ये फिरावे. जिल्हा काँग्रेसच्या आंदोलनात सहभागी व्हावे. प्रदेश पदाधिकाऱ्यांनी नेमून दिलेल्या जिल्ह्यात महिन्यातून किमान ६ पूर्ण दिवस दौरे करावे, दोन दिवस प्रदेश कार्यालयाने दिलेली जबाबदारी पूर्ण करावी. महिन्याच्या १० तारखेला प्रदेश कार्यालयाला अहवाल सादर करावा. संयुक्तिक कारणांशिवाय सलग ३ बैठकांना गैरहजर राहिल्यास पदाधिकाऱ्याला कार्यमुक्त केले जाईल, असेही सपकाळ म्हणाले.

### डॉ. नीलम गोऱ्हे यांचे आढावा बैठकीत निर्देश

# ऊसतोड महिला कामगारांच्या समस्यांना प्राधान्य द्यावे

**बीड :** विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी जिल्हाधिकारी अविनाश पाठक आणि पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्यासमवेत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत बीड जिल्ह्यातील ऊसतोड महिला कामगारांच्या समस्या, महिला व बालकांच्या सुरक्षेच्या उपाययोजना, पाणीटंचाई, रोजगार हमी योजना, तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.



बैठकीत डॉ. गोऱ्हे यांनी उसतोड महिला कामगारांच्या समस्या, त्यांच्या मुलांच्या वसतिगृहांची स्थिती आणि सॅनिटरी नॅपकिन्सची उपलब्धता याबाबत चिंता व्यक्त करत संबंधित यंत्रणांना तातडीने पावले उचलण्याचे निर्देश दिले. त्याचप्रमाणे, काही बालगृहांची अनधिकृतता लक्षात घेता, सर्व बालगृहांचे पत्ते एकसारखे असतील, तर ती मुले बाहेरून आणलेली असण्याची शक्यता लक्षात घ्या, असे स्पष्ट निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

शाळांमध्ये गुड टच - बॅड टच विषयी मुलांना माहिती देणे आवश्यक असल्याचे सांगून, बालकांविरोधात वाढणाऱ्या अत्याचाराच्या घटनांना पायबंद घालण्यासाठी उपाययोजना करण्याचा आग्रह त्यांनी धरला. जिल्ह्यातील पाणीटंचाई संदर्भातही चर्चा झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी ३१ जुलैपर्यंत पाण्याचे नियोजन झाल्याचे सांगितले. मात्र बीड नगर परिषदेची अत्यंत वाईट परिस्थिती असून, विहीर अधिग्रहण, टँकर व तात्पुरती नळ योजना यांचा प्रभावी वापर करण्याची गरज डॉ. गोऱ्हे यांनी अधोरेखित केली.

### रोजगार हमी योजनेचा आढावा

जिल्ह्यातील रोजगार हमी योजनेत साडेसहा लाख जॉब कार्ड धारक असूनही निधी प्रलंबित आहे. याबाबत आपण संबंधित अधिकाऱ्यांशी थेट चर्चा करून निर्णय घेऊ, असे आश्वासन डॉ. गोऱ्हे यांनी दिले. सामाजिक वनीकरण, गाव पातळीवर क्रीडांगण व उद्यानांची निर्मिती, महिला स्वच्छतागृहांची आवश्यकता यासारख्या मुद्द्यांवरही त्यांनी सविस्तर चर्चा केली. मुकादमांच्या माध्यमातून काम करणाऱ्या मजुरांची अधिकृत नोंदणी करण्यात यावी, असे निर्देश देत, त्यातून ऊसतोड कामगारांचे संरक्षण सुनिश्चित करता येईल, असा विश्वासही डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

### गर्भाशय काढणे (हिस्टरेक्टॉमी) या प्रक्रियेवर नियंत्रण

हिस्टरेक्टॉमी प्रक्रियेवर कडक अंमलबजावणी करण्याचे निर्देश देत, ऊसतोड महिला कामगारांमध्ये याचे प्रमाण कमी झाल्याचा उल्लेखही त्यांनी केला. बीड जिल्ह्यात महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षेबाबत सकारात्मक गोष्टी ऐकायला मिळाव्यात, अशी अपेक्षा आहे," असे उद्गार विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी काढले. ठोस उपाययोजना होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

# केईएमच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे 'गांधीगिरी' आंदोलन

## दोन महिन्यांचा रखडलेला पगार देण्याची मागणी

**मुंबई :** मुंबई पालिकेच्या अखत्यारीतील केईएम रुग्णालयामध्ये २००९-१० पासून रोजंदारी व २०१६-१७ पासून बहुउद्देशीय कामगार चतुर्थश्रेणी पदावर कार्यरत आहेत. मात्र मागील दोन महिन्यांपासून या कर्मचाऱ्यांचे वेतन झाले नाही. त्यामुळे त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. यासाठी मंगळवारी रोजंदारी, बहुउद्देशीय कामगारांनी केईएम रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगिता रावत आणि अधिकाऱ्यांना गुलाबपुष्प देऊन गांधीगिरीने आंदोलन केले.

केईएममध्ये रोजंदारीवर १५३, तर बहुउद्देशीय कामगार म्हणून २५० कर्मचारी कार्यरत आहेत. रुग्णालय प्रशासनाने या कर्मचाऱ्यांना फेब्रुवारी व मार्च महिन्याचे वेतन अद्याप दिलेले नाही. त्यामुळे घराचे भाडे, वीजदेयक, घर खर्च, मुलांचे शिक्षण, आई-वडिलांच्या औषधाचा खर्च कसा भागवायचा असा प्रश्न या कर्मचाऱ्यांना पडला आहे. या कर्मचाऱ्यांनी मंगळवारी सकाळी ११ वाजता अधिष्ठाता डॉ. संगीता रावत आणि अधिकाऱ्यांना गुलाब पुष्प देऊन आंदोलन केले.

## पुस्तकांना मित्र माना

पुस्तकांना मित्र माना, करुन त्यांना वंदना
ग्रंथ देती ज्ञान आम्हा, नको त्यांची वंचना
विद्या, कला सारी शास्त्रे
ग्रंथामध्ये एकवटती
जगण्याचे मार्ग भले
त्यांच्यातच सापडती
ऱ्हदयातच स्थान दया ना, तीच त्यांची अर्चना
ग्रंथ देती ज्ञान आम्हा, नको त्यांची वंचना
गुरु समान ग्रंथ हे
तेच देती ज्ञानदृष्टी
ग्रंथ जगाची खिडकी
ग्रंथ आनंदाची वृष्टी
पोहोचो ते साऱ्या जगी, हिच एक प्रार्थना
ग्रंथ देती ज्ञान आम्हा, नको त्यांची वंचना
ग्रंथाविना भासतसे
रितेसे उदरभरण
त्याच्यातच दडलेले
ग्रंथाचे अमरपण
पसरो जगी राज्य त्यांचे, हिच असे कामना
ग्रंथ देती ज्ञान आम्हा, नको त्यांची वंचना

**श्रीनिवास गडकरी**
**रोहा पेण पुणे**

# सॅनिटरी पॅड्स, डायपर, कालबाह्य औषधांचे संकलन करणार

**मुंबई -** वापरलेले सॅनिटरी पॅड्स, डायपर, कालबाह्य औषधी आदी नागरिकांच्या वैयक्तिक वापराशी संबंधित असलेल्या घरगुती स्वच्छताविषयक बाबींच्या संकलनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागाच्या वतीने ‘घरगुती सॅनिटरी आणि विशेष काळजीयोग्य कचऱ्याचे संकलन सेवा कार्यान्वित केली जाणार आहे. मुंबईतील विविध गृहनिर्माण संस्था, निवासी संकुल, श्रृंगार केंद्र (ब्यूटी पार्लर), महिला वसतिगृह, शैक्षणिक संस्था आदी आस्थापनांना या सेवेचा लाभ घेता येईल. यासाठी संबंधित आस्थापनांना रितसर नोंदणी करावी लागणार आहे. नोंदणीची प्रक्रिया २२ एप्रिलपासून कार्यान्वित करण्यात आली असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

या उपक्रमाबाबत उपआयुक्त (घनकचरा व्यवस्थापन) किरण दिघावकर यांनी सांगितले की, मुंबईमध्ये सध्या रोज सुमारे ७ ते ८ हजार टन घनकचरा निर्माण होतो. यापैकी ७० ते ८० टन कचरा हा वैयक्तिक स्वच्छतेशी संबंधित असतो. त्यामध्ये प्रामुख्याने वापरलेले सॅनिटरी नॅपकिन्स, डायपर्स, टॅम्पॉन्स, निरोध आणि इतर स्वच्छतासंबंधित बाबींचा तसेच शरीर पुसण्यासाठी वापरलेले विविध द्रवांनी दूषित कापूस, बँडेजेस (जसे की लघवी, रक्त, लाळ, पू, विष्ठा, नखांनी दूषित झालेले), कालबाह्य औषधी (इंजेक्शन, सुई, रेझर ब्लेड्स) आणि श्रृंगार केंद्रामध्ये (ब्यूटी पार्लर) निर्माण होणारा कचरा (वॅक्सिंग स्ट्रिप्स, पीपीई) आदींचा समावेश असतो.

# कोडिंग यूजी प्रवेश परीक्षा जाहीर

**मुंबई :** कोडिंग आणि मूलभूत प्रोग्रामिंग कौशल्यांवर केंद्रित भारताची पहिली यूजी प्रवेश परीक्षा ‘कोडिंग न्यूटन स्कॉलॅस्टिक ॲप्टिट्यूड टेस्ट’ न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीने जाहीर केली आहे. फिजिक्स, केमिस्ट्री आणि गणिताचे ज्ञान आवश्यक असलेल्या पारंपरिक परीक्षांप्रमाणे, कोडिंग एनएसएटी न्यूटन स्कूल ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये प्रवेशासाठी एक अद्वितीय पर्यायी मार्ग उपलब्ध करून व्यावहारिक कोडिंग क्षमतांचे मूल्यांकन करते. इच्छुक विद्यार्थी प्रवेशासाठी अर्ज करू शकतात.

# बेस्टचा मुंबईकरांच्या जीवाशी खेळ!

## बस घेण्यास टाळाटाळ करत असल्याचा जनता दलाचा आरोप

**मुंबई :** शहरातील प्रदूषण कमी करण्यासाठी इलेक्ट्रिक बसचा वापर वाढविण्याचा निर्णय झालेला असताना बसचा पुरवठा वेळेवर न करणाऱ्या कंपन्यांना पाठीशी घालून बेस्ट प्रशासन मुंबईकरांच्या जीवाशी खेळत असल्याचा आरोप जनता दल (से) पक्षाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात केला आहे.

याबाबत पत्रात नमूद करण्यात आले आहे की, राष्ट्रीय शुद्ध हवा अभियान अंतर्गत इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या वातानुकूलित एक मजली २,१०० बस भाड्याने घेण्याचा निर्णय बेस्ट प्रशासनाने मे २०२२ मध्ये घेतला होता. या बस पुरविण्याची तयारी इव्हे ट्रान्ससह टाटा मोटर्स, स्विच मोबिलिटी आदी आठ कंपन्यांनी दर्शवली होती. त्यात बेस्ट व्यवस्थापनाने इवे ट्रान्स कंपनीची निवड करून सर्व बस पुरविण्याचे काम या एकाच कंपनीला दिले होते. वार्षिक किमान ७० हजार किलोमीटरचे अंतर गृहित धरून अनुदानासह प्रति किलोमीटर ४६ रुपये ८१ पैसे दराने तर अनुदानाशिवाय प्रति किलोमीटर ५६.८१ रुपये दराने या बस पुरविल्या जाणार होत्या.

कंपनीने स्वीकृतिपत्र दिल्यापासून पहिल्या सहा महिन्यात २५ टक्के बस नवव्या महिन्यापर्यंत आणखी २५ टक्के तर २० मे २०२३पर्यंत उर्वरित ५० टक्के बस पुरवायच्या होत्या. परंतु कंपनीने आजतागायत ४२८ बस पुरविल्या आहेत. शहराची लोकसंख्या लक्षात घेता १० हजार बस आवश्यक असताना सध्या बेस्टच्या एकूण बसची संख्या तीन हजाराच्या खाली गेली आहे.

# सामाजिक क्षेत्रातील अनुकरणीय कार्यासाठी पोस्को महाराष्ट्र स्टीलचा रोटरीतर्फे सन्मान.




**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**
**माणगांव रायगड**

**माणगांव :-** स्टील उद्योग क्षेत्रात आघाडीचे नाव असलेल्या पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीला शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल "रोटरी सीएसआर पुरस्कार २०२५" या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. रोटरी इंटरनॅशनल डीस्ट्रीक्ट ३१३१ (रायगड आणि पुणे जिल्हा) ने आयोजित केलेला रोटरी सीएसआर पुरस्कार २०२५ समारंभ १८ एप्रिल २०२५ रोजी पुणे येथील हयात रीजन्सी येथे आयोजित करण्यात आला होता. यामध्ये सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कंपन्यांना सन्मानित करण्यात आले.माणगांव तालुक्यातील विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनी सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून शिक्षण, पर्यावरण, आरोग्य, महिला सक्षमीकरण तसेच इतर कल्याणकारी उपक्रम सातत्याने राबवत असते तसेच आसपासच्या परीसातील स्थानिक लोकांचे जीवनमान उचंविण्यावर आणि सक्षमीकरण करण्यावर नेहमीच भर दिला आहे. कंपनी मार्फत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, शाळांच्या मुलभूत सुविधांचा विकास व गुणवत्ता सुधारणा, शाळांमध्ये सिस्टरहूड रिलेशनशिप प्रकल्प, विज्ञान संच वाटप, शाळांमध्ये ई-लर्निंग चा सेट-अप, संगणक संच वाटप, विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी बस ची व्यवस्था, उच्चशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती असे विविध उपक्रम राबविले जातात.पोस्को कंपनी शिक्षण क्षेत्रामध्ये करत असलेल्या उपक्रमांचे निवड समितीने कौतुक केले. हा पुरस्कार केवळ आत्तापर्यंत केलेल्या कामगिरीचीच कबुली देत नाही तर एक चांगली सामाजिक चळवळ निर्माण करण्याच्या दिशेने आमचा प्रवास सुरू ठेवण्यासाठी आम्हाला प्रेरणा देतो, अशी भावना यावेळी कंपनीच्या प्रतिनिधींनी व्यक्त केली.

# हिंदी सक्तीच्या मुद्द्यावर अखेर सरकारची माघार, राळेगावात मनसेकडून आनंदोत्सव साजरा

दैनिक युवक आधार
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

राळेगाव:- राज्यातील शाळांमध्ये हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या निर्णयावर मनसेने केलेल्या जोरदार विरोधानंतर अखेर आज राज्य सरकारने माघार घेतली आहे. शालेय शिक्षण मंत्री यांनी आज विधानसभेत याबाबत घोषणा केली. त्यानुसार हिंदी आता राज्यातील शाळांमध्ये अनिवार्य भाषा नसेल. राज्य सरकारने या निर्णयाला तात्पुरती स्थगिती दिली आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. गेल्या काही दिवसांपासून राज्यातील शिक्षण क्षेत्रात हिंदी भाषा अनिवार्य करण्याच्या मुद्द्यावरून वाद निर्माण झाला होता. यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी "हिंदू आहो हिंदी नाही" अशी गर्जना करत सरकारच्या हिंदी धोरणाला कडाडून विरोध केला होता. विद्यार्थ्यांवर भाषेचा अतिरिक्त भार पडेल, तर मराठी भाषेला दुय्यम दर्जा मिळेल व मराठी पतन होईल अशी भूमिका मनसेने घेतली होती. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने अखेर नमते घेत हा निर्णय स्थगित केला आहे. यात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा मोठा विजय झाला असून या विजयाचा आनंद साजरा करण्यासाठी आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने राळेगांव शहरात तहसील समोर मोठे फ्लेक्स लावून मराठी भाषा, मनसे व राजसाहेब ठाकरे यांच्या विजयाच्या घोषणा देत संपूर्ण वातावरण मराठीमय करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे जिल्हा उपाध्यक्ष शंकर




वरघट, तुषार वाघमारे ओम मडावी, प्रवीण ओंकार, संदिप गुरुनुले, हर्षल पराते, ओम कुमरे, विकी बारेकर, आकाश ससाणे,सुरज ससाणे, कुणाल चिंचाळकर, संकेत पचाटे, मंगेश पारिसे,प्रतिक समजूरकर, सह महाराष्ट्र सैनिक उपस्थित होते.

**राजेंद्र टूर्स अँड ट्रॅव्हल्स पर्वती रोड, पुणे**
**डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन**






## बाजारभाव

| | |
|---|---|
| सोने | ₹ ९८,४८४ (१० ग्रॅम) |
| चांदी | ₹ ९५,६०७ (१ किलो) |
| डॉलर | ₹ ८५.२३ -०८ पैसे |
| सेन्सेक्स | ७९,५९५.५९ +१८७.०९ |
| निफ्टी | २४,१६७.२५ +४१.७० |

# व्यापार करार : अटींना अंतिम रूप

■ भारत-अमेरिका प्रस्तावित द्विपक्षीय करार ■ यूएस ट्रेड रिप्रेझेंटेटच्या निवेदनात माहिती

**नवी दिल्ली :** भारत आणि अमेरिकेने प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराच्या (बीटीए) वाटाघाटीसाठी आराखड्याची रूपरेषा सांगणाऱ्या संदर्भाच्या अटींना अंतिम रूप दिले आहे, असे अमेरिकेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

यूएस ट्रेड रिप्रेझेंटेट (यूएसटीआर) जेमिसन ग्रीर यांनी सांगितले की, सुरू असलेल्या चर्चेतून अमेरिकन वस्तूंसाठी नवीन बाजारपेठ उघडून आणि अमेरिकन कामगारांना हानी पोहोचवणाऱ्या अयोग्य प्रथांना संबोधित करून संतुलन आणि परस्परसंवाद साधण्यास मदत होईल.

आतापर्यंत भारताच्या रचनात्मक सहभागाचे स्वागत करण्यात आले आहे आणि मी दोन्ही देशांतील कामगार, शेतकरी आणि उद्योजकांसाठी नवीन संधी निर्माण करण्यास उत्सुक आहे, असे त्यांनी एका निवेदनात म्हटले आहे.

मला पुष्टी करताना आनंद होत आहे की, यूएसटीआर आणि भारताच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयाने परस्पर व्यापारावरील वाटाघाटींसाठी एक आराखडा तयार करण्यासाठी संदर्भ अटींना अंतिम रूप दिले आहे, असे राजदूत ग्रीर म्हणाले. भारतासोबतच्या व्यापारी संबंधात परस्परसंबंधाचा 'गंभीर' अभाव असल्याचा दावा त्यांनी केला.

यूएसटीआरनुसार, युनायटेड स्टेट्स बाजारपेठेतील प्रवेश वाढविण्याचा, टॅरिफ आणि नॉन-टेरिफ अडथळ्यांना कमी करण्याचा आणि दीर्घकालीन फायद्यांची खात्री करण्यासाठी अतिरिक्त वचनबद्धतेच्या मजबूत संचावर वाटाघाटी करत आहे.

अमेरिकेने भारतासोबतचे महत्त्वपूर्ण व्यापार अडथळे फार पूर्वीपासून ओळखले आहेत आणि परिणामी, अमेरिकेने २०२४ मध्ये भारतासोबत ४५.७ अब्ज डॉलर वस्तूंची व्यापार तूट राहिली, जी २०२३ च्या तुलनेत ५.१ टक्क्यांनी (२.२ अब्ज डॉलर) वाढली आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

फेब्रुवारीमध्ये अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीत भारताने लागू केलेल्या टॅरिफ कपातीचे अमेरिकेने स्वागत केले आणि 'बीटीए'चा भाग म्हणून यूएस उत्पादनांवरील वाढीव आयात शुल्क आणखी कमी करण्याच्या इच्छेचे अमेरिकेने स्वागत केले.

२०२४ मध्ये अमेरिकेचा भारतासोबतचा एकूण वस्तूंचा व्यापार १२९.२ अब्ज डॉलर इतका अंदाजित होता. अमेरिकेच्या मते, जगातील सर्वात मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये भारताचा सरासरी लागू आयात शुल्क १७ टक्के आहे, तर अमेरिकेचा सरासरी लागू आयात शुल्क ३.३ टक्के आहे.

कृषी उत्पादनांवर भारताचा सरासरी लागू दर ३९ टक्के आहे तर यूएसएचा फक्त ५ टक्के आहे.

टेरिफ व्यतिरिक्त, व्यापारातील तांत्रिक अडथळे, नियामक अडथळे आणि सेवा, औद्योगिक आणि कृषी क्षेत्रातील बाजारपेठेतील प्रवेशावरील निर्बंध देखील भारतातील यूएस निर्यात कमी करतात, असे त्यात म्हटले आहे. अध्यक्ष ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी सर्व देशांवर १० टक्के शुल्क लादले आणि अमेरिकन कंपन्यांनी पुन्हा अमेरिकत कारखाने उघडण्यासह अमेरिकेची सर्वात मोठी व्यापार तूट असलेल्या राष्ट्रांवर वैयक्तिक परस्पर उच्च आयात शुल्क लागू केले.



### पंतप्रधान मोदी - उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांच्यातील चर्चेचा लाभ

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे उपाध्यक्ष जेडी व्हान्स यांनी येथे व्यापक चर्चा केल्यामुळे भारत आणि अमेरिकेने सोमवारी सांगितले की, त्यांनी परस्पर फायदेशीर द्विपक्षीय व्यापार करारासाठी वाटाघाटींमध्ये महत्त्वपूर्ण प्रगती केली आहे. २०१३ मध्ये जो बिडेन यांनी नवी दिल्लीला भेट दिल्यानंतर १२ वर्षांत भारताला भेट देणारे व्हान्स हे अमेरिकेचे पहिले उपाध्यक्ष आहेत. १३ फेब्रुवारी रोजी दोन्ही देशांनी बीटीएसाठी वाटाघाटी करण्याची घोषणा केली होती. कराराचा पहिला टप्पा या वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत अंतिम करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# स्टीलवरील १२ टक्के आयात शुल्कामुळे आयातीवर परिणाम

■ जीटीआरआयचा अहवालात दावा

■ देशांतर्गत किमतीत वाढ, एमएसएमईंना फटका बसणार

**नवी दिल्ली :** केंद्र सरकारने पाच स्टील उत्पादनांच्या श्रेणींवर १२ टक्के 'सेफगार्ड' आयात शुल्क लागू केल्याने त्यांची आयात थांबू शकते आणि आयातदारांना या वस्तू देशांतर्गत कंपन्यांकडून खरेदी करण्यास भाग पाडले जाऊ शकते, जे या आकारणीनंतर किमती वाढवण्याची शक्यता आहे, असे थिंक टँक 'जीटीआरआय'ने मंगळवारी सांगितले.

निवेदनात म्हटले आहे की, भारतीय उत्पादक घर्षण-प्रतिरोधक प्लेट्ससारख्या विशेष स्टील्सची मागणी पूर्ण करू शकत नाहीत. त्यामुळे आयात करणे आवश्यक आहे. परंतु नवीन सुरक्षा आयात शुल्कामुळे स्थानिक पोलाद मिल्सच्या उत्पादन खर्चात ८-१० टक्क्यांनी वाढ होऊ शकते.

ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह (जीटीआरआय) ने म्हटले आहे की, देशांतर्गत स्टीलचे उत्पादन १९ टक्क्यांनी वाढले आहे आणि क्षमता वापर जास्त (८३.९० टक्के) असतानाही, डीजीटीआर (व्यापार उपायांचे महासंचालक) यांनी या शुल्काची शिफारस उद्योगांच्या अडचणींची पडताळणी न करता केली असल्याची चिंता व्यक्त केली.

ही धोरणे 'मेक इन इंडिया'च्या भावनेच्या विरोधात आहेत. एमएसएमई उत्पादन उत्पादनाच्या ३३ टक्के करतात, परंतु वाढता इनपूट खर्च आणि मर्यादित पुरवठा यामुळे अनेकांना व्यवसायापासून दूर जावे लागू शकते, असे जीटीआरआय संस्थापक अजय श्रीवास्तव म्हणाले.

आम्ही नेहमी विसरतो की, विशेषीकृत स्टीलची मागणी पूर्ण करण्यासाठी स्थानिक उत्पादन पुरेसे नाही आणि मोठ्या प्रमाणात स्टील आयात करणे आवश्यक आहे. यामुळे स्थानिक मोठ्या पोलाद निर्मात्यांना जीडीपी आणि निर्यातीला हानी पोहोचवणारी देशांतर्गत किंमत वाढवावी लागते, असे ते पुढे म्हणाले.

## निवडक

### टाटा पॉवर रिन्युएबल एनर्जी आणि टाटा मोटर्समध्ये करार

**मुंबई :** टाटा मोटर्स आणि टाटा पॉवर रिन्यूएबल एनर्जी लिमिटेड (टीपीआरईएल) ही टाटा पॉवरची उपकंपनी व भारतातील शुद्ध ऊर्जा परिवर्तनामधील अग्रगण्य कंपनी यांनी सहयोगाने १३१ मेगावॉट विंड-सोलार हायब्रिड रिन्यूएबल एनर्जी प्रोजेक्ट विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण पॉवर परचेस ॲग्रीमेंट (पीपीए)वर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. वार्षिक जवळपास ३०० दशलक्ष युनिट्स विजेची निर्मिती होईल. करारावर टाटा मोटर्सच्या ऑपरेशन्स, कमर्शियल व्हेईकल्सचे व्हाईस प्रेसिडेंट विशाल बादशाह आणि टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल्सच्या ऑपरेशन्सचे व्हाइस प्रेसिडेंट प्रमोद चौधरी यांनी केली.

### पेटीएम मनीकडून 'पे लेटर'साठी व्याजदरात कपात

**मुंबई :** वन९७ कम्युनिकेशन्स लिमिटेडची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या पेटीएम मनीने आज त्याच्या अलीकडेच सुरू झालेल्या 'पे लेटर (एमटीएफ - मार्जिन ट्रेडिंग फॅसिलिटी)' सेवा अंतर्गत व्याजदरात कपात आणि सुधारित ब्रोकरेज रचना जाहीर केली आहे. नवीन स्लॅबप्रमाणे व्याजदर आता ९.७५ टक्के वार्षिक पासून सुरू होणार आहेत, जे याआधीच्या १४.९९ टक्के फिक्स रेटपेक्षा कमी आहेत, असे पेटीएम मनीच्या प्रवक्त्याने सांगितले.

### फोनपेचे पिनकोड ॲपद्वारे औषधांची घरपोच डिलिव्हरी


**मुंबई :** फोनपेचे पाठबळ लाभलेल्या पिनकोड या हायपरलोकल ई-कॉमर्स ॲप्लिकेशन ॲपतर्फे आता बंगळुरू, मुंबई व पुणे या शहरांमध्ये २४-तास ऑनलाइन फार्मसी सेवा सुरू केली आहे. या सेवेच्या माध्यमातून आवश्यक औषधे २४ तास कधीही मिळू शकतात. ग्राहक आता कोणत्याही वेळेस औषधांची ऑर्डर देऊ शकतात आणि जवळच्या स्थानिक औषधा विक्रेत्यांकडून केवळ १० मिनिटांत औषधांची डिलिव्हरी मिळवू शकतात. ज्यांच्याकडे डॉक्टरांची चिठ्ठी नाही, अशा ग्राहकांसाठी पिनकोड ॲपच्या माध्यमातून पात्र डॉक्टरांचा मोफत ऑनलाईन सल्ला घेण्याची सुविधा उपलब्ध आहे, असे पिनकोडचे सीईओ विवेक लोहचेब म्हणाले.

### मॅटर एरा नम्मा बंगळुरूमध्ये लाँच

**मुंबई :** भारतातील आघाडीची टेक्नॉलॉजी इनोव्हेशन कंपनी असलेल्या मॅटरने आपली फ्लॅगशिप गियर्ड इलेक्ट्रिक बाइक -एरा-भारताच्या इनोव्हेशन कॅपिटल, बंगळुरूमध्ये अधिकृतपणे लाँच केली आहे. मॅटरच्या वर्ल्ड-क्लास मॅन्युफॅक्चरिंग हबच्या उद्घाटनानंतर मार्केट विस्ताराच्या त्यांच्या संकल्पनेचा हा भाग आहे. मॅटर एरा आता प्री-रजिस्ट्रेशन शो-रूम किमतीत १.८८ लाखांपासून उपलब्ध आहे, असे मॅटरचे संस्थापक आणि ग्रुप सीईओ, मोहल लालभाई यांनी सांगितले.

# सहाव्या सत्रातही बाजारात तेजी

## बँकिंग, एफएमसीजी शेअरची खरेदी



**मुंबई :** भारतीय शेअर बाजारात मंगळवारी, सलग सहाव्या सत्रात तेजी होती. बँकिंग आणि एफएमसीजी शेअर्स आणि विदेशी गुंतवणूक संस्थांकडून खरेदी झाल्याने बाजारात उत्साह होता.

बीएसई सेन्सेक्स १८७.०९ अंकांनी किंवा ०.२४ टक्क्यांनी वाढून ७९,५९५.५९ वर बंद झाला. दिवसभरात तो ४१५.८ अंकांनी किंवा ०.५२ टक्क्यांनी वाढून ७९,८२४.३० वर पोहोचला. अशाच प्रकारे एनएसई निफ्टी ४१.७० अंकांनी किंवा ०.१७ टक्क्यांनी वाढून २४,१६७.२५ वर बंद झाला. आयटी आणि ऊर्जा क्षेत्र वगळता बहुतेक निर्देशांक सकारात्मक राहिले. रिॲल्टी, एफएमसीजी आणि बँकिंग क्षेत्राला मोठा लाभ झाला.

सेन्सेक्सवर्गवारीत आयटीसी, हिंदुस्थान युनिलिव्हर, महिंद्रा अँड महिंद्रा, एचडीएफसी बँक, इटर्नल, कोटक महिंद्रा बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया आणि आयसीआयसीआय बँकेचे समभाग वधारले, तर पॉवर ग्रिड, भारती एअरटेल, इन्फोसिस आणि बजाज फिनसर्व्हचे समभाग घसरले. स्मॉल आणि मिडकॅप निर्देशांक ०.८१ टक्क्यांनी वाढला. बीएसई क्षेत्रीय निर्देशांकांमध्ये रिअल्टी २.४० टक्क्यांनी, एफएमसीजी १.८७ टक्के, ग्राहक टिकाऊ वस्तू १.४३ टक्के, आरोग्य सेवा ०.७५ टक्के, ग्राहक विवेकाधिकार ०.७२ टक्के आणि बँकेक्स ०.६१ टक्के वाढली. बीएसई टेक, बीएसई फोकस्ड आयटी, पॉवर, युटिलिटीज, आयटी आणि टेलिकम्युनिकेशन मागे राहिले. बीएसईवर तब्बल २,४७७ समभाग वाढले तर १,५०४ घसरले आणि १४९ अपरिवर्तित राहिले.

जागतिक तेल बाजारात ब्रेंट क्रूड १.६१ टक्क्यांनी वाढून ६७.३३ अमेरिकन डॉलर प्रति बॅरलवर पोहोचले. विदेशी संस्थागत गुंतवणूकदारांनी (एफआयआय) सोमवारी १,९७०.१७ कोटी रुपयांच्या समभागांची खरेदी केली.

### सहा सत्रात गुंतवणूकदारांच्या संपत्तीत ३३.३५ लाख कोटींची वाढ

तेजीच्या सहा सत्रांत गुंतवणूकदार ३३.३५ लाख कोटी रुपयांनी श्रीमंत झाले आहेत. या कालावधीत निर्देशांकाने सुमारे ८ टक्क्यांनी उसळी घेतली आहे. ९ एप्रिलपासून बीएसई सेन्सेक्स ५,७४८.४४ अंकांनी किंवा ७.७८ टक्क्यांनी वाढला आहे, तर निफ्टी १,७६८.१ अंकांनी किंवा ७.८९ टक्क्यांनी वाढला आहे. या कालावधीत, बीएसई-सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल रु. ३३,५५,३८४ .०१ कोटींनी वाढून रु. ४,२७,३७,७१७.२३ कोटी (५.०२ ट्रिलियन डॉलर) झाले.

# जागतिक आयटी कंपन्यांनी भारतात गुंतवणूक करावी



■ अर्थमंत्री सीतारामन यांचे आवाहन

■ आयटी उद्योगातील प्रमुखांशी चर्चा

■ विविध पेन्शन फंड व्यवस्थापकांशी बैठक

**सॅन फ्रान्सिस्को :** आयटी उद्योगातील अनेक प्रमुखांची भेट घेतली आणि त्यांना तांत्रिक सहयोग आणि गुंतवणुकीच्या संधी शोधण्यासाठी आमंत्रित केले, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सोमवारी सांगितले. दरम्यान, अर्थ सचिव अजय सेठ यांच्या उपस्थितीत सीतारामन विविध पेन्शन फंड व्यवस्थापक आणि इतर संस्थात्मक गुंतवणूकदारांसह गोलमेज बैठकीला उपस्थित होते.

येथे गुगल क्लाऊडचे मुख्य कार्यकारी अधिकारी थॉमस कुरियन आणि त्यांच्या टीमसोबत द्विपक्षीय बैठकीदरम्यान, सीतारामन यांनी त्यांना 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत प्रादेशिक सहयोगासाठी आणि भारत व जागतिक बाजारपेठेसाठी तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी भारतातील स्थानिक कंपन्यांशी संपर्क करण्यासाठी प्रोत्साहित केले. त्यांनी अलीकडच्या वर्षांत डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत भारताच्या डिजिटल पायाभूत सुविधांच्या परिवर्तनात्मक उत्क्रांतीबद्दल चर्चा केली. त्यामुळे देशाला डिजिटल अवलंबनात जागतिक नेता म्हणून स्थान देण्यात आले.

कुरियन यांनी भारताच्या एआय मिशनचे कौतुक केले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत पुढे जात आहे. जमीन आणि सागरी केबल पायाभूत सुविधांद्वारे भारताला जागतिक नेटवर्कशी जोडण्याच्या गरजेवरही त्यांनी भर दिला.

अर्थमंत्री सीतारामन यांनी भारत सरकारने डिजिटल पायाभूत सुविधांना चालना देण्यासाठी वर्षानुवर्षे उचललेली पावले अधोरेखित केली, ज्यात इंडियाएआय मिशनसाठी १०,३०० कोटी रुपयांचे बजेट, भारतजेन आणि सर्वम-1 द्वारे एआय भाषा तंत्रज्ञान तयार करणे आणि आयआयटी जोधपूर येथे जनरेटिव्ह एआयसाठी सृजन केंद्राची स्थापना करणे समाविष्ट आहे, असे @saidej_iit मधील आणखी एका पोस्टमध्ये म्हटले आहे.

अर्थमंत्र्यांनी त्यांना प्रस्तावित रु. १ लाख कोटी कॉर्पस, खासगी क्षेत्र-चालित संशोधन, विकास आणि नावीन्यपूर्ण योजनेद्वारे संभाव्य संधींबद्दल समजावून सांगितले आणि भारत अनेक विकसित देशांच्या पुढे असलेल्या एआय कौशल्य प्रवेशामध्ये जागतिक स्तरावर प्रथम क्रमांकावर असल्याची माहिती दिली.

A16z चे जनरल पार्टनर अंजनी मिधा आणि VMware सल्लागार रघु रघुराम यांच्यासोबतच्या दुसऱ्या बैठकीत, सीतारामन यांनी सुचवले, की a16z आणि VMware यांना शिक्षण, आरोग्य सेवा आणि एआय सेंटर्स ऑफ एक्सलन्ससह एआयच्या डोमेनमधील सर्व क्षेत्रांमध्ये सहकार्य शोधणे आवडेल.

### भारत एआय महासत्ता बनणार - देबंजन साहा

डेटा रोबोटचे सीईओ देबंजन साहा यांनीही अर्थमंत्र्यांची भेट घेतली आणि भारताच्या एआय महासत्ता बनण्याच्या क्षमतेचा उल्लेख केला आणि एआय सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये सहभागी होण्यात स्वारस्य व्यक्त केले, ज्यासाठी केंद्रीय अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये अलीकडेच ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

# 'ऊर्जा खरेदी करारासाठी राज्यांशी चर्चा'



प्रल्हाद जोशी यांची माहिती

**गुरुग्राम :** केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांनी मंगळवारी सांगितले, की ४० गिगावॉट अक्षय ऊर्जा (RE) खरेदीसाठी राज्यांशी वीज खरेदी करार (PPAs) वर स्वाक्षरी करण्यासाठी चर्चा सुरू आहे.

आम्ही २०३० पर्यंत ५०० गिगावॉटचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी वार्षिक ५० गिगावॉट अक्षय ऊर्जा क्षमतेचे लक्ष्य ठेवत आहोत, ज्यामध्ये अर्थातच २९२ गिगावॉट सौरऊर्जेचा समावेश आहे, असे जोशी यांनी येथे राष्ट्रीय सौरऊर्जा संस्थेत सौर पीव्ही मॉड्यूल चाचणी सुविधेच्या उद्घाटनाप्रसंगी पत्रकारांना सांगितले.

भारताने २०२४-२५ मध्ये २९.५२ गिगावॉट अक्षय ऊर्जा क्षमता जोडली आहे. नवीन आणि २०३२ मध्ये सर्वोच्च वीज मागणी सध्याच्या पातळीपेक्षा दुप्पट होईल. मे २०२४ मध्ये सर्वोच्च ऊर्जेची मागणी २५० गिगावॉटच्या सार्वकालिक उच्चांकावर पोहोचली. ऊर्जा मंत्रालयाने या उन्हाळ्यात २७० गिगावॉट कमाल वीज मागणीचा अंदाज व्यक्त केला आहे, असे नवीकरणीय ऊर्जा मंत्री म्हणाले.

जोशी म्हणाले की, उपलब्ध भूसंपत्तीतून जास्तीत जास्त सौरऊर्जा निर्मितीसाठी भारताला नावीन्यपूर्ण उपाय तयार करण्याची गरज आहे. उंच इमारतींसारख्या मर्यादित जागेतून सौरऊर्जा निर्माण करण्यासाठी काचेसारख्या बांधकाम साहित्याचा वापर करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपायांचा वापर करण्याचे आवाहनही मंत्र्यांनी केले.

ते म्हणाले की, ४० गिगावॉट अक्षय ऊर्जा प्रकल्पांसाठी 'पीपीए'वर स्वाक्षरी करण्यासाठी राज्यांशी चर्चा सुरू आहे. प्रधानमंत्री सूर्य घर मुफ्त बिजली योजनेंतर्गत १२ लाख कुटुंबांनी रूफटॉप सोलर बसवले असल्याचेही जोशी यांनी सांगितले.

# पुरवठा साखळी सुरळीत झाल्यास भारताला फायदा

## आरबीआय बुलेटिनमध्ये दावा

**मुंबई :** पुरवठा साखळी सुरळीत झाल्याचा भारताला लाभ होईल. तसेच विविध एफडीआय स्त्रोत आणि लवचिकता आणि जागतिक गुंतवणूकदारांशी संलग्नता यांचाही देशाला फायदा होणार आहे, असे आरबीआयच्या एप्रिलमधील बुलेटिनमध्ये म्हटले आहे.

शिवाय, भारताची सेवा निर्यात आणि पैसे पाठवण्याचा सातत्यपूर्ण ओघ चालू खात्यासाठी एक महत्त्वपूर्ण 'बफर' प्रदान करत आहे, असे बुलेटिनमधील 'अर्थव्यवस्थेची स्थिती' या लेखात म्हटले आहे.

केंद्र सरकारच्या धोरणांची मदत होऊन भारताला जागतिक अस्थिरतेला संधीमध्ये बदलण्यास आणि उदयोन्मुख जागतिक आर्थिक पातळीवर आपले स्थान मजबूत करण्यास मदत करू शकते, असे त्यात म्हटले आहे.

व्यापार आणि टॅरिफ तणाव वाढणे आणि परिणामी आर्थिक बाजारातील अस्थिरता यामुळे नजीकच्या काळात जागतिक वाढ कमकुवत होण्याबाबत चिंता निर्माण झाली आहे. जरी जागतिक आर्थिक दृष्टिकोन कमी झाल्यामुळे भारताच्या आर्थिक विकासावर कमकुवत बाह्य मागणीमुळे परिणाम होऊ शकतो, तरी देशांतर्गत वाढीची इंजिने, उदा. उपभोग आणि गुंतवणूक, बाह्य आव्हानांना तुलनेने उत्तम सामोरे जातील, असे लेखात म्हटले आहे.

२०२५ साठी सामान्य नैऋत्य मोसमी पावसाच्या अंदाजामुळे शेती क्षेत्राच्या शक्यतांना चालना मिळाली आहे. त्यामुळे शेतीचे उत्पन्न वाढू शकते आणि अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात राहू शकतात. तथापि रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) बुलेटिनमधील लेखात व्यक्त केलेली मते लेखकांची आहेत आणि मध्यवर्ती बँकेच्या मतांचे प्रतिनिधित्व करत नाहीत, असे स्पष्ट केलेह आहे.

## यूएईच्या CARACAL आणि भारताच्या ICOMM चा हैदराबादमध्ये कारखाना सुरु

# 'मेक इन इंडिया' अंतर्गत अत्याधुनिक लघुशस्त्रांचे उत्पादन सुरू




**हैदराबाद :** भारताच्या संरक्षण क्षेत्रातील मेक इन इंडिया अर्थात भारतातच शस्त्रांत्रे निर्मितीचा एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. यूएईतील CARACAL (EDGE ग्रुपची घटक कंपनी) आणि भारतीय ICOMM (MEIL ग्रुपची सहाय्यक कंपनी) यांनी हैदराबाद येथे अत्याधुनिक लघुशस्त्र उत्पादन कारखाना सुरू केला आहे. 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' योजनेंतर्गत सुरू झालेला हा कारखाना यूएईमधून भारतात तंत्रज्ञान हस्तांतरणाने सुरू होणारा पहिला संरक्षण शस्त्रास्त्र प्रकल्प आहे.

**प्रकल्पाची मुख्य वैशिष्ट्ये**

या अत्याधुनिक केंद्रात CARACAL च्या अत्याधुनिक शस्त्रांचे उत्पादन होणार आहे, ज्यात रायफल्स, स्नायपर रायफल्स, सबमशीन गन्स आणि कॉम्बॅट पिस्तुल यांचा समावेश आहे.

■ **प्रमुख शस्त्रे:** CAR 816 क्लोज-क्वार्टर बॅटल रायफल, CSR 338 स्नायपर रायफल, CMP9 सबमशीन गन

■ **शस्त्रांची गरज आणि उपयोग :** या शस्त्रांचा उपयोग भारतीय सैन्य, अर्धसैनिक दल, विशेष दल, राज्य पोलीस दल, तसेच जागतिक निर्यातीच्या गरजा पुरवण्यासाठी केला जाईल.

■ **ICOMM आणि CARACAL यांची भूमिका :** ICOMM चे व्यवस्थापकीय संचालक सुमंत पटुरू म्हणाले की, हे केंद्र पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आत्मनिर्भर भारत दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करून, हे उत्पादन केंद्र भारताला आत्मनिर्भरतेच्या मार्गावर आणखी पुढे नेईल.

CARACALचे सीईओ हमाद अलमेरी यांनी सांगितले की, ही भागीदारी भारताच्या संरक्षण उद्योगाच्या वाढीस गती देण्याचा महत्त्वाचा टप्पा आहे.

■ **उद्योगाचे महत्त्व :** भारतीय कौशल्य आणि अमिराती तंत्रज्ञान यांचे एकत्रीकरण : भारताच्या जागतिक दर्जाच्या संरक्षण उत्पादन क्षमतेला चालना.

■ **आत्मनिर्भर भारतासाठी अत्यावश्यक पाऊल :** स्थानिक उत्पादनाची वाढ आणि संरक्षण क्षेत्रात स्वावलंबन.

■ **निर्यात क्षमता :** भारत आता जागतिक पातळीवर उच्च दर्जाची शस्त्रे पुरवठा करू शकेल.